बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ५१ | बुधवार,दि.२९ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# गोंदियावरुन पुणे-मुंबई उड्डाण व्हाया हैद्राबाद

## १ डिसेंबरपासून इंडिगोचे विमान उडणार गोंदियावरुन

**गोंदिया** – तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळावरील खंडित झालेली प्रवासी विमान वाहतूक सेवा येत्या १ डिसेंबरपासून पुन्हा सुरु होत आहे. यापुर्वी १३ मार्च २०२२ पासून या विमानतळावरून इंदूर-गोंदिया-हैदराबाद प्रवासी विमान वाहतूक सेवा सुरू झाली होती.मात्र अवघ्या सहा महिन्यातच ही सेवा बंद पडली. तेव्हापासून या विमानतळावरुन पुन्हा प्रवासी सेवा सुरु करण्याकरीता प्रयत्न सुरु होते.अखेर माजी केंद्रीय विमान वाहतूक मंत्री व खासदार प्रफुल पटेल यांच्या पुढाकाराने येत्या १ डिसेंबरपासून इंडिगो एअरलाईन्स गोंदियाच्या बिरसी विमानतळावरुन प्रवासी वाहतूक करण्यास सज्ञ झाली आहे.त्याकरीता इंडिगोच्यावतीने तिरुपती-हैद्राबाद-गोंदिया या मार्गाची आधीच घोषणा करण्यात आली होती.त्यात इंडिगोच्यावतीने गोंदियावासियांना पुन्हा दिवाळी भेटच्या स्वरुपात गोंदियावरुन व्हाया हैद्राबाद मार्गे पुणे व मुंबई

**Gondia - Mumbai - Gondia**
6E 7263 GDB HYD 12:55 - 14:55
6E 5259 HYD BOM 16:45 - 18:15
6E 5246 BOM HYD 08:05 - 09:25
6E 7534 HYD GDB 10:20 - 12:35

**Gondia - Pune - Gondia**
6E 7263 GDB HYD 12:55 - 14:55
6E 426 HYD PUN 20:50 - 22:00
6E 352 PUN HYD 06:25 - 07:35
6E 7534 HYD GDB 10:20 - 12:35



सेवा सुध्दा १ डिसेबंरपासूनच सुरु करण्याची घोषणा केली आहे.विशेष म्हणजे त्यादृष्टीने वेळापत्रक सुध्दा तयार करण्यात आले आहे.

इंडिगो कपंनीने विमानतळाची पाहणी केली असून करुन कंपनीने १७ नोव्हेंबरला नॉनशेड्युल प्रायोगिक तत्वावर हैद्राबाद ते गोंदिया असा प्रवास ७२ आसनी





विमानाने करुन विमान उड्डाणाचे प्रात्यक्षिक पुर्ण केले.बिरसी विमानतळावर या अनुषंगाने कर्मचारी भरती प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून तिकिट विक्रीलाही सुरवात झाली असून बिरसी विमानतळावरून इंडिगो एअरलाइन्सचे विमान १ डिसेबंरला ङ्गटेक ऑफफ मुंबई पुणेच्या दिशेने हैद्राबाद मार्गे उड्डाण करणार हे निश्चित झाले आहे.सोबतच गोंदियाच्या बिरसी विमानतळावर ठउऊग टीमद्वारे ऊत्नजठ उपकरण २२ नोव्हेंबरला बसवण्यात आले.या यत्रांव्दारे विमानाच्या वैमानिकाला विमानतळावरुन विमान उडवितांना व उतरवितांना योग्य रुट मार्गदर्शन मिळणार आहे.या यंत्रामुळे पायलटला पिन पॉईट करण्यात मदत मिळणार आहे.

बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ असून पुणे व मुंबईकरीता विमानसेवेची सातत्याने मागणी होती. गोंदियातील विद्यार्थी व नोकरीच्या निमित्ताने ये जा करणारे संख्या हैद्राबाद पेक्षा पुण्यात अधिक असल्याने गोंदिया पुणे सेवा सुरु करण्यासोबतच हैद्राबाद इंदुर असा मार्ग हवा अशी मागणी केली जात होती,त्या मागणीच्या अनुषगांने इंडिगो एअरलाईसने आपले वेळापत्रक तयार केले आहे.

पुण्यावरुन गोंदियाकरीता सकाळी ६ वाजता व मुंबईवरुन सकाळी ८ वाजता हैद्राबाद मार्गे विमान झेप घेईल व दुपारी १२.३५ ला गोंदियात दाखल होईल. पुणे व मुंबईला जातांना मात्र प्रवाश्यांना हैद्राबाद विमानतळावर मुंबईकरीता दीड तास व पुण्याकरीता सात तास बसावे लागणार आहे.

# शिंदे समिती बरखास्त करा; छगन भुजबळांची मागणी

**पुणे**:– मराठा आरक्षणासाठी मुख्यमंत्र्यांनी स्थापलेल्या शिंदे समितीचे काम आता संपले आहे. त्यामुळे या समितीचा अहवाल आम्ही मान्य करणार नाही, अशी आक्रमक भूमिका कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांनी मांडली आहे. मुख्यमंत्र्यांनी शिंदे समिती स्थापन केली तेव्हा त्यास आमचा विरोध नव्हता. कारण त्यांच्याकडे केवळ मराठवाड्यातील निजामशाहीतील कुणबी नोंदी पडताळणी काम होते. मात्र, आता राज्यभरात जिल्हाजिल्ह्यात कुणबी नोंदी तपासल्या जात आहे. त्यास आमचा विरोध आहे, असे छगन भुजबळ म्हणाले. ते पुण्यात पत्रकारांशी संवाद साधत होते.



**शिंदे समितीला राज्यभर पुरावे पडताळण्याची संमती नव्हती**

कुणबी प्रमाणपत्र मिळाल्यास त्याला आपोआप ओबीसी आरक्षण मिळते. कुणबी नोंद असल्यास प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही, पण सरसकट मराठ्यांना प्रमाणपत्र देण्यास विरोध असल्याचे भुजबळ म्हणाले. भुजबळ पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समिती नेमली त्याला हरकत नाही. शिंदे समितीला राज्यभर पुरावे पडताळण्याची संमती नव्हती. सर्वच प्रमाणपत्रावर कुणबी लिहिले जात आहे. आपला मराठा आरक्षणाला विरोध नसून झुंडशाहीला विरोध असल्याचे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, भुजबळ यांनी एक दगड मारला का? एक टायर जाळला का? हे म्हणतात आमच्या लोकांवर गुन्हे दाखल करू नका, बीड कुणी जाळले हे बघा ना. मी जबाबदारीने वक्तव्य केली आहेत. इतरांना समाजाबद्दल बोलण्याचा अधिकार आहे तेवढाच भुजबळला सुद्धा बोलण्याचा अधिकार असल्याचे भुजबळ म्हणाले.

**सरसकट मराठा आरक्षण मान्य नाही**

भुजबळ पुढे म्हणाले की, मराठवाड्यातील कुणबी असून प्रमाणपत्र मिळत नाही हा मूळ मुद्दा होता. याचा तपास व्हावा यासाठी न्यायमूर्ती शिंदे समिती स्थापन झाली. संपूर्ण महाराष्ट्रात जाऊन जिल्ह्यात जाऊन करा असे सांगितले नव्हते. त्यामुळे त्यांचे काम संपले आहे. सरसकट मराठा आरक्षण द्या ही मागणी आम्ही मान्य करू शकत नाही. मराठवाड्यातील वंशावळ चेक करुन कुणबी प्रमाणपत्र मिळाले तर ते ओबीसीमध्ये येतात, असेही त्यांनी सांगितले.

**मी कुठल्याही समाजाचा प्रचार करत नाही**

यावेळी बोलताना भुजबळ कुठल्याही समाजाचा प्रचार करत नसल्याचे म्हणाले. ते म्हणाले की, मी कोणत्याही समाजाच्या विरोधात नाही. मी ओबीसी समाजाची बाजू मांडतो. मनोज जरांगे एबीपी माझावर म्हणतात, भुजबळ यांच्या पाहुण्यांनी बीड जाळले. मराठा समाजाला विरोध नाही, आरक्षण द्यायला विरोध नाही. पोलीस महिला हॉस्पिटलमध्ये आहेत. पोलिसांना पाठिंबा देण्याची गरज आहे. बीडमध्ये नेमके काय झाले याबाबत होम मिनिस्टर यांनी माहिती द्यावी असेही भुजबळ म्हणाले.

# ओबीसींच्या न्याय हक्कासाठी भरत निचिते यांच्या आमरण उपोषणाचा चौथा दिवस

**शहापूर:** मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, या मुख्य मागणीसह इतर १३ मागण्यांसाठी ओबीसींच्या न्याय्य हक्कांसाठी शहापुरात बेमुदत उपोषण आंदोलन २६ नोव्हेंबर



संविधान दिनापासून सुरूकरण्यात आले आहे.ओबीसी योध्दा भरत निचिते यांनी उपोषम आंदोलनाला सुरवात केली असून आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे.

राज्यभरात सुरू असलेल्या आंदोलनानंतर मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी करण्यात येत आहे, परंतु असे सरसकट प्रमाणपत्र देऊ नये, तसेच मराठा विरुद्ध ओबीसी यांचा सुरूअसलेला संघर्ष थांबवावा, या व इतर मागण्यांसाठी अखिल भारतीय ओबीसी महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष भरत निचिते यांनी वालशेत गावी बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांच्या या उपोषणास ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, पुणे या जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने ओबीसी बांधवांनी उपोषणास्थळी उपस्थित राहून पाठिंबा दर्शवला आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, परंतु मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र दिल्यास मूळ कुणबी समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय नेतृत्वापासून वंचित राहील. ओबीसीच्या आरक्षणाला कुठेही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली. या उपोषणाला अनेक जिल्ह्यांमधून ओबीसी समाजाचा पाठिंबा मिळाला असून वाळशेत गावामधील ग्रामस्थ व शहापूर तालुक्यामधील ओबीसी समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अनेक संघटनांनी भरत निचिते यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवला आहे.

या आंदोलनाला ओबीसी नेते प्रा.श्रावण देवरे,ठाणे जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार,आमदार दौलत दरोडा,प्रकाश भांगरथ,अपर्ण खाडे,वैशाली म्हसकर यांच्यासह ओबीसी संघर्ष समिती,ओबीसी अधिकार मंच,ओबीसी सेवा संघ,ओबीसी महासंघ आदी संघटनांनी भेट देत पाठिंबा दिला आहे.

**ओबीसींची जनगणना करण्याची मागणी**

सरसकट कुणबी प्रमाणपत्राच्या मागणीमुळे ओबीसी समाजात असंतोष निर्माण झाला आहे. बिहारच्या धतीवर राज्यात ओबीसींची जनगणना करण्यात यावी. या मागणीसाठी आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला आहे.

# अवकाळी पावसाने,वाढली हुडहुडी; शेतातील धानपिकाचे नुकसान

गोंदिया : हवामान खात्याने ठरविलेला अंदाज अगदी तंतोतंत बसला असून, सोमवारी (दि. २७) सकाळी ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी बरसल्या. यामुळे मात्र जिल्ह्यात थंडीचा जोर वाढला असून जिल्हावासीयांना हुडहुडी भरुन आली आहे. मंगळवारी (दि. २८) जिल्ह्याचे किमान तापमान १५.९ अंशावर आले होते. तर हवामान खात्याने जिल्ह्याला आज मंगळवारीही (दि. २८) यलो अलर्ट दिला असून सकाळपासूनच पावसाने हजेरी लावल्याने जिल्ह्यात थंडीचा जोर आणखी वाढला आहे.

मागील काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढू लागला होता व सायंकाळ होताच गरम कपड्यांची गरज भासत होती. अशात वातावरणाने परत एकदा बदल दाखविला असून हवामान खात्याने पावसाचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार, मागील दोन-तीन दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण तयार



झाले होते.त्यातच हवामान खात्याने जिल्ह्याला सोमवारी व मंगळवारी यलो अलर्ट दिला होता. हवामान खात्याचा अंदाज येथे खरा ठरला असून, सोमवारी (दि. २७) सकाळपासूनच ढग दाटून आले असून त्यातच पावसाच्या सरी बरसल्या. यामुळे थंडीचा जोर वाढला असून ढगाळ वातावरण बघता पावसाळा परतून आल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

**पिकाचे नुकसान झाल्यास पीक विमा कंपनीस पुर्वसूचना दया**

सध्या जिल्ह्यात अवकाळी पाऊस सुरु आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत काढणी पश्चात नुकसान या बाबी अंतर्गत विमा संरक्षीत क्षेत्र नुकसानग्रस्त झाल्यास त्या अधिसूचित पिकांचे नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करुन निश्चित करण्यात येते.भात पिकाच्या काढणीनंतर शेतात कापणी करुन पसरवून अथवा पेंढ्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते. कापणी/ काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या भात पिकाचे काढणीनंतर दोन आठवड्याच्या आत अवकाळी पावसामुळे नुकसान झाल्यास वैयक्तिक स्तरावर पंचनामे करुन योजनेच्या निकषांचे अधिन राहून नुकसान भरपाई निश्चित केली जाते.काढणी पश्चात नुकसान या जोखीमेअंतर्गत विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांनी सर्व्हे नंबर नुसार बाधित पीक व बाधित क्षेत्राबाबत घटना घडल्यापासून ७२ तासाच्या आत नुकसानी बाबतची सूचना युनिव्हर्सल सोम्पो जनरल इंशुरन्स कंपनी लिमिटेड या पीक विमा कंपनीचे टोल फ्री क्रमांक १८००२००५१४२/ १८००२००४०३०, विमा कंपनीचे तालुकास्तरीय कार्यालयाला द्यावे असे कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.

# नॅचरल ग्रोवर्स साखर कारखाना गाळप हंगामाचे खासदार पटेल यांच्या शुभहस्ते शुभारंभ



**लाखांदूर**– परिस्थितीनुरूप हा कारखाना बंद पडला होता.पण वैनगंगा व चुलबंद नदीच्या खो?्यातील ऊस उत्पादक शेतक?्यांच्या हितासाठी व लोकोपयोगी कामांसाठी पुन्हा साखर कारखाना सुरु करण्यात आला आहे. निश्चितच लाखांदूर, पवनी, अर्जुनी मोर, साकोली, लाखनी, सडक अर्जुनी, देसाईगंज व परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी वरदान ठरणार आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना अन्य पिकांच्या उत्पादनाचा पर्याय मिळावा व शेतीवर आधारित अन्य उदयोग यावेत याच उद्देशाने कारखाना सुरु करण्यात आल्याचे प्रतिपादन खा.प्रफुल पटेल यांनी केले.ते आज लाखांदूर जि. भंडारा येथील नॅचरल ग्रोवर्स साखर कारखान्याच्या पहिल्या गाळप हंगामाचे शुभारंभ, गव्हाण व मोळी पूजन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

खा.पटेल पुढे म्हणाले की, कामांसाठी कोणतीही बोंबाबोंब न करता विकास कार्य करण्यावर विश्वास ठेवतो. शेतकरी व शेतमजुर व बेरोजगारांचे हितासाठी नेहमी प्रयत्न केले आहेत. सध्या साखर कारखान्याची क्षमता ८०० मेट्रिक टन असून पुढे कारखान्याची क्षमता वाढविण्यात येणार आहे. या कारखान्यामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार असून प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष पणे शेतमजूर व बेरोजगार युवकांना रोजगार मिळणार आहे.

# नक्षलींचा पुन्हा रक्तपात,तरुणाची गोळ्या घालून हत्या

**गडचिरोली :** पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरून नक्षलवाद्यांनी आणखी एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या केल्याने खळबळ उडाली आहे. रामजी आत्राम (२७, रा. कापेवंचा ता. अहेरी) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून घटनास्थळी आढळलेल्या नक्षल पत्रकात तो खबऱ्या असल्याचा दावा केला आहे. दक्षिण गडचिरोली भागात महिनाभरात नक्षलवाद्यांनी तिघांची हत्या केल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीवरुन, २४ नोव्हेंबररोजी अहेरी तालुक्यातील राजाराम खांदला पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या कापेवंचा येथील रहिवासी असलेला रामजी हा तरुण आपल्या शेतात काम करीत होता. दरम्यान, संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास काही सशस्त्र नक्षलवाद्यांनी त्याठिकाणी जाऊन गोळ्या झाडून त्याची हत्या केली.पोलीस खबऱ्या असल्याच्या संशयावरुन नक्षल्यांनी रामजीची हत्या केल्याचा दावा नक्षल्यांनी घटनास्थळी टाकलेल्या पत्रकात केला आहे. मात्र, तो खबरी नव्हता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून तपासानंतर अधिक बाबी स्पष्ट होतील, असे पोलिसांनी सांगितले आहे. महिनाभरात दक्षिण गडचिरोलीत नक्षल्यांनी तिघांची हत्या केली आहे. १५ नोव्हेंबरला भामरागड तालुक्यातील पेनगुंडा येथे दिनेश गावडे, २३ तारखेला एटापल्ली तालुक्यातील टिटोळा येथील पोलीस पाटील लालसू वेडदा आणि शुक्रवारी अहेरी तालुक्यातील कापेवंचा येथील रामजी आत्राम या तरुणाची हत्या केली.

# ९५५ गावांसाठी फक्त १५७ तलाठी

## महसुल विभागाला पद रिक्ततेचे ग्रहण, दहा वर्षापासून कार्यालय भाडेही थकीत

**गोंदिया:** शेतकरी व महसूल विभाग यामधील कामाचा दुवा म्हणजे तलाठी हा असतो. शेतीचा सातबारा पिकपेरा जमिनीचे खरेदी विक्री नंतरचे फेरफार, ई-पिक पाहणी करणे, अतिवृष्टी व विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानींचे, गौण खनिज, नुकसनाचे पंचनामे करणे चौकशी करणे या विविध कामासाठी तहसील कार्यालय व शेतकरी यामधील दुवा म्हणून तलाठी कार्य करतो. मात्र एकूणच जिल्ह्याचा विचार करता ९५५ गावांसाठी १५७ तलाठ्यांवर भार आहे. सरासरी विचार करता एका तलाठ्याकडे ६ गावांचा कारभार आहे. त्यामुळे कोणत्या




गावाला न्याय मिळणार, कुठले काम लवकर होणार हा प्रश्न उपस्थित होतो.

महसूल विभागाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात. त्यामुळे हा विभाग महत्त्वाचा आहे. मात्र, तहसील विभागात अधिकारी, कर्मचाऱ्यांची २५ टक्के पद रिक्त असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या विभागाच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचवल्या जाणाऱ्या योजनांवरही याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यासाठी एकूण २५२ तलाठी पदसंख्या मंजूर असून त्यापैकी केवळ १५७ तलाठी कार्यरत आहे.

### दुसऱ्याच कामांची भरमार

**तलाठी म्हंटले की महसूल हेच डोळ्यासमोर येते. मात्र आजघडीला एका तलाठ्याकडे दोन ते तीन साझ्यांचा प्रभार आहे. कार्यालयीन कामे करताना कोणतीही अडचण नाही. मात्र अतिरिक्त प्रभार आणि त्यातही इतर कामे, बैठका यामुळे काम करताना प्रचंड दमछाक होते. शिवाय नेतेमंडळी आणि लहानसहान कार्यकर्त्यांचा रोष देखील ओढवून घ्यावा लागतो.**

**तलाठी, गोंदिया तालुका**

### दूरच्या साझ्यांना न्याय देण्यास अडचण

**ज्या साझ्यांचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला आहे. तो साझा लांब आहे. त्याकरिता दिवस ठरवून दिले आहेत. मात्र त्या दिवशी ऐनवेळी बैठक किंवा कार्यालयीन कामे सोडून इतर कामांचा आदेश आल्यास त्याला प्राधान्य द्यावे लागते. अशात प्रभार असलेला आणि नियुक्ती असलेल्या साझ्यांना न्याय देण्यात मोठी अडचण निर्माण होते. तरीही शेतकरी आणि विद्यार्थ्यांना जिथे असू तिथे बोलावून त्यांची कामे करुन देतो.**


**तलाठी, सालेकसा तालुका**

### तालुकानिहाय स्थिती

| तालुका | मंजूर पदे | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| तिरोडा | ३३ | २३ | ०८ |
| गोरेगाव | २७ | १७ | १० |
| गोंदिया | ४८ | ३५ | १३ |
| देवरी | ३५ | १७ | १८ |
| आमगाव | २३ | १४ | ०९ |
| सालेकसा | २२ | १४ | ०८ |
| अर्जुनी मोरगाव | ३५ | २० | १५ |
| सडक अर्जुनी | २९ | १५ | १४ |
| एकूण | २५२ | १५७ | ९५ |

# गोंदिया जिल्ह्यात डेंग्यूचे दीड महिन्यात ३३ रुग्ण

**गोंदिया** : पावसाळ्यात डासजन्य आजार जास्त फोफावतात, असे दिसून येत असले तरी आता पावसाळा संपला असूनही डेंग्यूचा धोका काही कमी झालेला दिसून येत नाही. ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमधील २१ तारखेपर्यंत म्हणजेच दीड महिन्यांच्या कालावधीत जिल्ह्यात तब्बल ३३ डेंग्यू रुग्ण आढळून आले आहेत.



यावरून पावसाळा संपूनही डेंग्यूचा धोका काही कमी झालेला नसून, डेंग्यूचा मच्छर जिल्हावासीयांचा पिच्छा काही सोडेना, असे म्हणावे लागणार आहे.

### गोंदिया तालुक्यात जास्त धोका

**यंदा डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण गोंदिया तालुक्यातच आढळून आले आहेत. आता ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यातही हाच प्रकार कायम असल्याचे दिसले. कारण, ऑक्टोबर महिन्यात जिल्ह्यात २८ रुग्ण आढळून आले असून, त्यात १० रुग्ण गोंदिया तालुक्यातील आहेत. नोव्हेंबर महिन्यात पाच रुग्ण आढळून असून, सुदैवाने गोंदिया तालुक्यात एकही रुग्ण नाही.**

### सप्टेंबर महिन्यात केला कहर

**यंदा मलेरिया व डेंग्यूचा सर्वाधिक कहर सप्टेंबर महिन्यात दिसून आला. सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यात डेंग्यूचे ७१ रुग्ण आढळून आले होते. यात गोंदिया शहरातील आठ, तर गोंदिया तालुक्यात सर्वाधिक १५ रुग्ण होते. त्यानंतर रुग्णांचे प्रमाण कमी होत गेले. मात्र, पावसाळा संपूनही ऑक्टोबर महिन्यात तालुक्यातच १० रुग्ण आढळल्याने धोका काही संपलेला नाही, असेच म्हणावे लागणार आहे.**

पावसाळ्यात सर्वाधिक आजार बळावत असून, पाण्यापासून ते खाण्यापर्यंत सर्वच बाबींकडे बारीक लक्ष द्यावे लागते. असे असतानाच जिल्हावासीयांची डासांपासून सुटका नसल्याने त्यांच्या विषारी डंकाचा सामना करावा लागतो. हेच कारण आहे की, जिल्ह्यात दरवषी मलेरिया व डेंग्यूचा शिरकाव होऊन तो चांगलाच फोफावतो. यंदाही जिल्ह्यात मलेरिया व डेंग्यूचा शिरकाव झाला. जिल्हावासीयांना त्यांचा सामना करावा लागला. ऑक्टोबरपासून पावसाने जिल्हा सोडला. त्यानंतर डासजन्य आजारांचा प्रकोप कमी होणार असे वाटत होते. मात्र, याउलट परिस्थिती असून, पावसाळा संपूनही डासजन्य आजारांचा धोका काही कमी झालेला नाही.

जिल्ह्यात ऑक्टोबर व नोव्हेंबर या दीड महिन्यांच्या कालावधी डेंग्यूचे तब्बल ३३ रुग्ण आढळून आले आहेत. यामध्ये ऑक्टोबर महिन्यात २८ तर नोव्हेंबर महिन्यात २१ दिवसांत पाच रुग्ण आढळून आले आहेत. यावरून पावसाळा नसला तरी मच्छर काही पिच्छा सोडणार नाही हेच दिसून येते.

### ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यातील रुग्ण तालुकानिहाय

| तालुका | ऑक्टोबर | नोव्हेंबर |
|---|---|---|
| गोंदिया | १० | ०० |
| तिरोडा | ०० | ०१ |
| आमगाव | ०४ | ०२ |
| गोरेगाव | ०४ | ०० |
| देवरी | ०१ | ०० |
| सडक-अर्जुनी | ०६ | ०१ |
| सालेकसा | ०३ | ०० |
| अर्जुनी-मोरगाव | ०० | ०० |
| गोंदिया शहर | ०० | ०१ |
| तिरोडा शहर | ०० | ०० |

### डेंग्यू रुग्णांची महिनानिहाय आकडेवारी

| महिना | रुग्ण |
|---|---|
| जानेवारी ते जुलै | २६ |
| ऑगस्ट | ५३ |
| सप्टेंबर | ७१ |
| ऑक्टोबर | २८ |
| २१ नोव्हेंबर | ०५ |

## संपादकीय

# अवकाळीचा तडाखा

महाराष्ट्राच्या अनेक भागांत पुन्हा रविवारपासून अवकाळी पावसाने यावेळी तडाखा दिला असून खासकरुन पश्चिम विदर्भातील जिल्ह्यासह,मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक भागात त्याचा तडाखा सर्वात जास्त बसला आहे.त्याचवेळी पुर्व विदर्भातील धान उत्पादक जिल्ह्यात या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे शेतात कापलेल्या धानाचे कळपे पावसात सापडल्याने मोठे नुकसान झाले आहे.तर दुसरीकडे धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने केंद्रावर नेऊन ठेवलेल्या धानाच्या पोतीमधील धानही पावसामुळे खराब झाल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.एकीकडे सरकारी धोरणाच्या कचाट्यात सापडलेला शेतकरी पुन्हा अवकाळी पावसामुळे संकटात सापडल्याने या नुकसानभरपाईचे काय अशा प्रश्न या माध्यमातून उपस्थितीत झालेला आहे.

या अवकळा पावसामुळे राज्यातील नाशिक जिल्ह्यात जास्तच नुकसान झाले असून मोठ्या प्रमाणात द्राक्षबागांचे नुकसान झाले आहे. नाशिकमध्ये द्राक्ष बागांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो. महाराष्ट्रात गेल्या महिनाभरापासून ८० टक्के अवकाळी पावसाची नोंद झाली असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांत सतत सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नाशिक भागातील द्राक्ष उत्पादनाला जबर फटका बसला असून, कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याचे सांगण्यात येते. अवकाळीमुळे राज्यभरात सर्वत्र शेतीचे नुकसान झाले आहे. नाशिक भागात वायनरी उद्योग मोठ्या प्रमाणात आहे. त्यालाही या अवकाळीचा फटका बसला आहे. अवकाळी पावसामुळे वायनरी उद्योगाचे मोठे नुकसान झाले आहे. नाशिकला “द्राक्ष पंढरी’ म्हटले जाते. पण याच नगरीत आता तेथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा नुकसानामुळे खर्च वाढला आहे. हवामान बदल हे एक कारण या स्थितीसाठी आहे.

हवामान बदलाच्या या आविष्कारांमुळे शेतकऱ्यांना सर्वात जास्त नुकसान सोसावे लागत आहे. पॅरिस येथे झालेल्या हवामान परिषदेत हवामान बदलाच्या परिणामांचे निराकरण करण्यासाठी सर्व देशांनी खर्च करण्याचा निर्णय घेतला होता. पण अमेरिकेने त्यातून नंतर अंग काढून घेतले. पण हवामान बदलाच्या संकटांचा सामना सध्या जास्तीत जास्त शेतकरी वर्गालाच करावा लागत आहे. द्राक्ष बागा फुलोऱ्यात असतानाच द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळीचे संकट भेडसावत आहे. नाशिक जिल्हा हा द्राक्ष पंढरी म्हणून ओळखला जात असून तेथे २० टन प्रतिहेक्टर या प्रमाणानुसार १० लाख टन द्राक्ष उत्पादन होते. ८००० हेक्टर जमिनीचा उपयोग वेगवेगळ्या द्राक्षाच्या जातींचे उत्पादन घेण्यासाठी केला जातो. आता यातील बहुतेक द्राक्ष उत्पादन मातीत गेले आहे. महाराष्ट्र हेच भारतात द्राक्ष पिकवणारे सर्वात मोठे राज्य आहे. पण येथे शेतकऱ्यासमोर गेल्या महिनाभरापासून अवकाळीचे संकट आवासून उभे आहे. राज्यात एकूण देशातील द्राक्ष उत्पादनापैकी ८१ टक्के उत्पादन केले जाते. नाशिक जिल्हा हा वाइन कॅपिटल म्हणून ओळखला जातो. एकट्या नाशिक जिल्ह्यात २५ वायनरी सध्या सुरू आहेत. यामुळे नाशिक जिल्ह्याने द्राक्ष राजधानी म्हणून लौकिक प्राप्त केला असला तरीही अवकाळीमुळे द्राक्ष बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. द्राक्ष उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. देशात वाइनची विक्री वाढली आहे आणि त्यामुळे द्राक्षाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. पण हे सारे चांगले घडत असतानाच अवकाळीच्या संकटाने उद्योगाला वेढून टाकले आहे. वायनरी उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगारही निर्माण होत असल्याने अवकाळीमुळे नुकसान झाल्याचा दुष्परिणाम वाढत्या बेरोजगारीवर होण्याची शक्यता आहे. एक शेतकरीच संकटात सापडलेला नाही, तर इतरही अनेक घटक या अस्मानी संकटामुळे अडचणीत आले आहेत.

अवकाळीचे संकट आता नेहमीचे झाले आहे. त्यात आता नवीन काही राहिले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आता या संकटाशी तोंड देण्यास तयार राहिले पाहिजे. राज्य सरकार आता पाहणी करुन द्राक्षबागांच्या उत्पादकांना भरपाई देईल. पण त्यासाठी पंचनामे करावे लागतील. त्या प्रक्रियेत कितीतरी वेळ जाईल. पण सरकारने आता लवकर शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरू केली पाहिजे, तरच शेतकऱ्यांना भरपाई लवकर मिळेल. अवकाळीमुळे द्राक्षबागांचे नुकसान प्रचंड झाले आहे, कित्येक एकरावर बागा आडव्या झाल्या आहेत. कितीतरी बागांची द्राक्ष फुलोऱ्यात असतानाच नष्ट झाली आहेत. हे नुकसान फार मोठे आहे. राज्याच्या इतर भागांतही पावसाने शेतकऱ्याचे नुकसान केले आहे. पण नाशिकमध्ये जे द्राक्षांचे नुकसान झाले आहे, ते फार मोठे आहे. द्राक्ष राजधानीत अशा प्रकारे नुकसान होणे हा राज्याच्या अर्थव्यवस्थेला फार मोठा झटका आहे आणि त्यामुळे राज्याच्या प्रगतीवरही परिणाम होणार आहे. नाशिकची अर्थव्यवस्था संपूर्ण द्राक्षबागांवर चालते. त्यातच अवकाळीने तडाखा दिल्याने तीच कोसळण्याच्या बेतात आली आहे. पण याचा सर्वात वाईट परिणाम असा होणार आहे की, नाशिकमधून देशाचे जे अर्धे द्राक्ष उत्पादन निर्यात केले जाते. त्याला फटका बसण्याची शक्यता आहे. त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेलाही झटका बसणार आहे. ६५ हजार टन द्राक्ष उत्पादन निर्यात केले जाते. त्यामुळे देशाला कितीतरी अधिक परकीय चलन मिळते. पण आता हे नुकसान लक्षणीय आहे.

द्राक्ष बागांचा अभ्यास केला असता असे दिसते की, निर्यात होणारे उत्पादन जास्तीत जास्त अमेरिका आणि इतर युरोपीय देशांना जाते. तेव्हा द्राक्षबागांचे नुकसान हे संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान आहे. त्याशिवाय रशिया आणि चीन याही भारतातील द्राक्ष उत्पादनांच्या मोठ्या बाजारपेठा आहेत. आता शेतकरी यातून कसे सावरणार हा प्रश्न आहे. सरकार त्यांना मदत करेल आणि ते पुन्हा आपल्या पायावर उभे राहतील. पण त्या प्रक्रियेला विलंब होईल. भारतात द्राक्ष पिकाचे नुकसान नेहमीचेच आहे आणि त्यामुळे द्राक्ष बागा जळून जाण्याचा धोकाही मोठा असतो. नाशिक जिल्हा हा द्राक्षंसाठी प्रसिद्ध असला आणि एकट्या नाशिक जिल्ह्यात राज्यातील ५५ टक्के उत्पादन होत असले तरीही शेतकऱ्यांचे प्रश्न सारखेच आहे. जे मराठवाडा किंवा विदर्भातील शेतकऱ्याचे प्रश्न आहेत तेच नाशिकमधील शेतकऱ्याचे आहेत. अवकाळी पाऊस हा आता निसर्गातील नियमित होणारा प्रकार झाला आहे आणि त्यामुळे त्याच्याशी तोंड देण्याच्या उपाययोजना सरकाराने केल्या पाहिजेत. अवकाळी पाऊस हा नित्यनियमाने येऊन शेतीची नासाडी करत आहे. हवमान बदल यावर हा विषय सोडून देता येणार नाही. नाशिकच नव्हे तर अकोला, यवतमाळ आणि इतर कित्येक शेतीबहुल प्रांतात त्याने धुमाकूळ घातला आहे.

## सेवानिवृत्त सैनिक संघटनेच्या आमसभेत हिवाळी अधिवेशनावरील मोर्च्यात सहभागी होण्याचे आवाहन

**गोंदिया–** गोंदिया जिल्हा सेवानिवृत्त सैनिक संघटनेची वार्षिक आमसभा २६ नोव्हेंबरला केसर फॅमिली गार्डन रेस्टॉरेंट एकोडी (गोंदिया) येथे जिल्हाध्यक्ष टी.एन.बिसेन यांच्या अध्यक्षतेखाली व संघटनेचे राज्यअध्यक्ष चंद्रशेखर आलेगावकर यांच्या उपस्थितीत पार पडली.या आमसभेला १०० च्यावर सदस्य व निमंत्रित पाहुण्यांची उपस्थिती होती.या आमसभेत सुरवातील शाहिद जवांनाना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली.तसेच राज्यस्तरावर शासनासकडे प्रलंबीत असलेल्या मागण्याविषयी व संघटनेचे महत्व,ध्येय व उद्दिष्टांवर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली.पुनर्नियुक्त माजी सैनिकांना शासकीय कर्तव्य पार पाडतांना उद्भवणाऱ्या समस्यावरही चर्चा करण्यात आली.तसेच सभेत नवीन ११ सदस्यांचे स्वागत करण्यात आले.या आमसभेत संघटनेचे राज्यअध्यक्ष चंद्रशेखर आलेगावकर यांनी आपल्या मनोगतातून संघटनेची संपुर्ण माहिती दिली.प्रभाकर पुस्तोडे यांनीही मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात जिल्हाध्यक्ष बिसेन यांनी जुन्या पेन्शन योजनेसह इतर मुद्यावर १४ डिसेंबर पासून पुकारण्यात आलेला बेमुदत संपाची माहिती दिली.नागपूर येथे होणा?्या हिवाळी अधिवेशनात आपल्या संघटनेकडून होणाऱ्या मोर्च्यात सर्व सदस्यांनी सक्रिय भाग नोंदवावे असे आवाहन करण्यात आले.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# व्ही.पी.सिंग:मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक



‘तत्त्वनिष्ठेची जपणूक’ या सोमनाथ चटर्जी यांच्या आत्मचरित्रात ते म्हणतात की, व्ही.पी सिंग हे मूल्याधिष्ठित राजकारणाचे तसेच सामाजिक न्यायाचे प्रतिक होत. प्रधानमंत्री व्ही.पी.सिंग हे सर्वसहमती, मूल्याधिष्ठित राजकारण आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक होते. भारतीय समाजात न्याय आणि निती मूल्ये यांना अत्युच्च स्थान आहे. न्याय नितीचे अधिष्ठान असलेले तत्त्वज्ञान शिरसावंद्य मानले जाते. महत्तम लोकांच्या हितार्थ निती मूल्यांसाठी संघर्ष करणारी अवैदिक परंपरा प्रदीर्घकाळ राहिलेली आहे. ती आजही कायम आहे. वैदिकांच्या क्रूर अमानवी जुलमी व्यवस्थेविरुद्ध लढत असताना अवैदिक योद्धयांनी किंचितही मानवी नीतिमूल्ये ढळू दिली नाहीत. याचे असंख्य दाखले अगदी प्राचीन काळापासून मिळतात. बळीवंशातील सर्वच राजे या बाबतीत फार फार वेगळे होते. स्वकीय जनांच्या सुखासाठी शत्रूंशी झगडताना आपल्या प्राणांसह आपले सर्वस्व लुबाडले–ओरबडले गेले तरी त्याची पर्वा करायची नाही, ही त्यांच्या जगण्याचीही आणि मरण्याचीही रीत होती. त्यांना सत्ता नको होती असे नाही, परंतु आपली सत्ता विशिष्ट तत्त्वज्ञानावर, नीतिमूल्यांवर, जीवनदर्शनावर उभी असली पाहिजे, याची पुरेपूर काळजी ते घेत होते. त्यांनी आपल्या हाताने आपल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा विसर्जित केल्या असत्या आणि आक्रमक आर्य आपल्यापेक्षा वरचढ होत आहेत म्हटल्यावर त्यांच्यापुढे शरणागती पत्करली असती, तर त्यांच्या इतक्या पिढ्यांना आपले प्राण गमवावे लागले नसते. त्यांनी स्वतःच वैदिकांच्या रंगात रंगून जायचे ठरविले असते, तर आर्यांचे मांडलिक म्हणून ते सुखेनैव जगू शकले असते आणि त्यांनी टाकलेल्या सत्तेच्या छोट्यामोठ्या तुकड्यांवर पोट भरण्यासाठी लाळ घोटत सुखी राहू शकले असते. परंतु त्यांच्यापैकी कोणीही आत्मद्रोहाचा हा मार्ग पत्करला नाही. त्यांच्या सैन्यातील व प्रजेतील काही व्यक्तींनी वा गटांनी गद्दारीचा मार्ग स्वीकारला, हे खरे आहे. परंतु हिरण्याक्षापासून बाणापर्यंत कोणीही आपल्या जीवनमूल्यांपेक्षा आपल्या प्राणांना अधिक महत्त्व दिले नाही, मग त्यांच्याकडून जीवनमूल्यांपेक्षा सत्तेला अधिक महत्त्व दिले जाण्याची शक्यता तर फार दूरची झाली. अगदी जीवघेण्या संघर्षातही त्यांची हृदये स्वच्छ आणि मस्तके ताठ राहिली. त्यांच्या पद्धतीने जगणे हे तर खरे जगणे आहेच, पण त्यांच्या पद्धतीने मरणे हे देखील जीवनाचा झेंडा उंच उंच फडकविण्यासारखे आहे! (पृ. १४६–४७, बळीवंश, ले. डॉ आ ह साळुंखे) बळीराजा आणि बळीवंशातील ही नितीमूल्ये व्ही. पी.सिंगांनाही आपलीशी वाटावी यातच नीतीमूल्यांची यथार्थता दडलेली आहे. एका राजकीय अस्थिर परिस्थितीत लोकसभा त्रिशंकू असताना व्ही.पी.सिंग सरकार स्थापन झाले. जनता दलाच्या पुढाकाराने राष्ट्रीय आघाडी सरकारला बेभरवशाच्या भाजपचे बाहेरुन समर्थन. अशा परिस्थितीत सरकार अकराच महिने तरले. पण अनेक क्रांतिकारक निर्णय घेत व्ही.पी.सिंग सरकार भारतीय राजकारणाच्या इतिहासात अविस्मरणीय ठरले. व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू केला तेव्हा फार तणावग्रस्त स्थिती होती. एकीकडे मंडलची मागणी जोर धरत होती. व्ही.पी.सिंगांसोबतची मंडळी मंडल समर्थनार्थ तगडी होत होती. व्ही. पी.सिंग ज्या राष्ट्रीय आघाडीचे नेतृत्व करीत तिच्या जाहीरनाम्यात मंडल आयोग ओबीसींसाठी सवलती देण्याची मागणी होती. त्यामुळे व्ही.पी.सिंगांना मंडल आयोगाची अंमलबजावणी करणे ही मोठी कामगिरी पार पाडणे आव्हानात्मक होते. तर त्यांच्या सरकारला पाठिंबा असलेला भाजप आरक्षणाविरोधात असल्याने सरकार डळमळीत होण्याची शक्यता होती. भाजपाने मंदिर–मस्जिदचा मुद्दा उकरुन काढला आणि मंडलच्या वातावरणाला गढूळ करुन टाकले. व्ही.पी.सिंग यांनी मंडल लागू करू नये यास्तव ही कावेबाज चाल होती. सरकार पडण्याची तमा न बाळगता व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोग लागू केला. मंडल आयोग लागू केल्याबरोबर व्ही.पी. सिंगांवर प्रचंड टीका होऊ लागली. व्ही.पी.सिंगांना राक्षसाची उपमा देऊन आरक्षण विरोधक तुटून पडू लागले. इलेक्ट्रॉनिक्स मीडिया व प्रिंट मीडिया यांनी व्ही. पी. सिंगांवर अतोनात तोंडसुख घेतले. विश्वनाथ प्रताप सिंगांची प्रतिमा संपूर्णतः खलनायकाची रंगवण्यात तसूभरही कसर ठेवली नाही. ओबीसीचा मसिहा व्ही.पी. सिंग प्रचंड दुःखी अंतःकरणाने पण धीरगंभीरपणाने ही परिस्थिती पहात होते. राजकीय अस्थैर्य आणि तणाव दिसून येत होता. पण व्ही.पी. सिंगांनी मंडलची घोषणा मागे घेतली नाही.

व्ही.पी. सिंग काही मुस्लिम नव्हते. बौद्ध, जैन, पारशी अथवा ख्रिश्चन नव्हते. हिंदुविरोधीही नव्हते. ते हिंदू राजपूत होते, आणि बहुसंख्य मागास हिंदु असलेल्या ओबीसींच्या उत्कर्षासाठी भारतीय संविधानात अनुस्यूत असलेल्या कलम ३४० अन्वये स्थापित मंडल आयोग त्यांनी लागू केला होता. काय गुन्हा होता हा? की व्ही.पी.सिंगांना खलनायक, रावण, राक्षस ठरविण्यात आले होते. हे तेच व्ही.पी.सिंग होते ज्यांनी राजीव गांधींच्या काळातील बोफोर्स प्रकरणातील गैरव्यवहार चव्हाट्यावर आल्यानंतर नैतिक जबाबदारी म्हणून भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या मंत्री मंडळातून, मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडले. स्वच्छ प्रतिमेचे नायक बनले होते. नीतीयुक्त राजनीतीचे प्रतीक बनले होते. तत्कालीन प्रस्थापित राजकारणाला भ्रष्टाचारमुक्त पर्याय उभा करण्यासाठी विश्वनाथ प्रतापसिंग स्वच्छ प्रतिमेचा खात्रीचा चेहरा बनले होते. पण मंडल आयोग लागू करताच ते खलनायक वाटू लागते. व्यक्ती तीच होती, विश्वनाथ प्रतापसिंग, पण एका निर्णयाने माणसाची प्रतिमा सुलटची उलट बनविली. एवढा धसका मंडल आयोगाचा अर्थात ओबीसींना आरक्षण लागू होण्याचा का घेतला गेला? एससी एसटीच्या आरक्षणाला छुपा–खुला विरोध करत ज्यांनी ओबीसींची माथी भडकवली, आता मंडल शिफारशी नुसार ओबीसींना मिळणार असलेल्या आरक्षणामुळे त्यांच्या पोटात गोळा येऊ लागला. एससी–एसटीचे २२.५% आरक्षण कोटा वगळता संपूर्ण खुल्या प्रवर्गात ओबीसींना डावलून उच्चवर्णीयांचे उखळ पांढरे होत होते. उच्चवर्णीयांची प्रशासनात असलेली सद्दी ओबीसी आरक्षणामुळे पूर्णतः संपली तर नसतीच, पण ओबीसीचा टक्का वाढल्याने उच्चजातीयांच्या बरोबरीचा वाटा ओबीसींना प्रशासनात, निर्णय प्रक्रियेत नकोच! ओबीसींची उच्चजातीसोबत बरोबरी नको! हिच उच्चजातीय समूहाची कपटनिती राहिलेली आहे. प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग (१९८९–१९९०) यांचे उदाहरण अगदी अलिकडचे आहे. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसींना नोकऱ्यात राखीव जागा देण्याचा निर्णय घेतल्याने ब्राम्हणांचे नोकऱ्यातील प्रमाण काहीसे कमी होण्याची स्थिती निर्माण झाली होती. खरे तर वंचित समाजाला, इतर मागासवर्गाला संधी देण्यासाठी हा निर्णय घेतल्या गेला होता. परंतु ओबीसींना हलाखीच्या अवस्थतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न मनुस्मृतीच्या समर्थकांना देशद्रोह वाटला. ब्राम्हणाचे प्राबल्य कमी करणारा निर्णय म्हणून त्याकडे पाहिले गेले आणि प्रसार माध्यमामधून व्ही.पी.सिंगांची प्रचंड बदनामी केली गेली. वरच्या हिंदूंसाठी राबणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांकडून व्ही.पी. सिंगांना, विलन ठरविले गेले, रावण संबोधून प्रतिमांचे दहन केले गेले. ज्या संघटना, राजकीय पक्ष अयोध्येला राममंदिर बांधण्यासाठी धडपडतात त्या सर्व ओबीसीं विरोधी आहे मागास जातींच्या विरोधी आहे. मुस्लिमविरोधी आहे. मंडल आयोगाला विरोध करुन त्यांनी मागासजाती आणि मुस्लिमांना टार्गेट केले. म्हणजे ब्राह्मणच शासन, प्रशासनात राहू शकतात, उच्च स्थानी राहू शकतात, आरक्षणाच्या माध्यमातून मागासवर्गीय आले तरी त्यांना दुय्यम स्थाने दिली जातात. उच्च जात सत्ता टिकविली जाते. (पृ. ३५–३६, रा. स्व. संघ, जातीव्यवस्था आणि हिंदुराष्ट्र, ले. नागेश चौधरी) म्हणून ओबीसी आरक्षणास कळीचा विरोध होता. त्यामुळे व्ही.पी.सिंगांनी मंडल आयोग लागू करताच ब्रह्मवृंदाचा जळफळाट पाहण्याजोगा होता. व्ही.पी.सिंग मात्र निर्णयावर ठाम होते. मंडलचा निर्णय फिरवला असता, तर कदाचित ते बचावले असते. ते दीर्घकाळ प्रधानमंत्री पदावर कायम राहिले असते.

अटलबिहारी वाजपेयींना राजयोगाने हुलकावणीही दिली असती. घोटाळ्यांची दीर्घमालिका ज्यांच्या काळात गाजली ते पी. व्ही.नरसिंहरावांसारखे प्यादे चालले नसते. व्ही.पी. सिंग सरकार पडल्यानंतर जनता दल या पक्षाचेही अपूर्व नुकसान झाले. देशभर जनता दलाचा वाढलेला जनाधार खंडित होऊ लागला. जनता दलाचे विभाजन होऊन राष्ट्रीय पातळीवरील सक्षम पर्याय खिळखिळा होऊ लागला. मंडल विरुद्ध कमंडल रान पेटले ते ओबीसी हित विरोधासाठी, राम रथयात्रा, हिंदुत्वाचा टेंभा, मुस्लिम–विरोधाचा तडका, धार्मिक दंगे, बॉम्ब स्फोट भडका, बाबरी विध्वंस आणि जातीय–धार्मिक तेढ निर्माण करुन, ओबीसींना मंडलच्या लढ्यापासून दूर दूर नेण्यासाठीच ह्या कुरापती होत्या, असाच या घटनाक्रमाचा अन्वयार्थ लागेल. मंडलची घोषणा झाली नसती तर कदाचित हा घटनाक्रम वेगळा दिसला असता पण मंडलच्या घोषणेने ही जरतरची समीकरणे बिघडवून टाकली.

व्ही.पी.सिंगांनी निवडणूक जाहीरनाम्यात दिलेला शब्द पाळला. ते ओबीसीचा मसीहा ठरलेत. व्ही.पी. सिंग सरकार पडले, पण व्ही.पी.सिंग जिंकले.व्ही.पी.सिंगांनी स्वकीय जनांच्या हितासाठी ओबीसींच्या सुखासाठी, नीती मूल्याधिष्ठित तत्वासाठी प्रधानमंत्री पदाकडे कानाडोळा केला. सत्तेची पर्वा केली नाही. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. सामाजिक न्याय, ओबीसीकेंद्रित राजकारणाचा होरा दिसू लागला. व्ही.पी. सिंग या मूल्याधिष्ठित राजनीतीचे महानायक होते.

**अनुज हुलके**

# सामाजिक लोकशाहीसाठी संविधानाची गरज–सुनील शेळके

**बुलढाणा :** सामाजिक लोकशाही हा जीवनमार्ग आहे. तर स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जीवनतत्वे आहेत. राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजे. सामाजिक लोकशाहीसाठी संविधान गरजेचे आहे, असे प्रतिपादन ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे संस्थापक सुनील शेळके यांनी केले.



संघटनेच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. मंचावर जिल्हा नियोजन अधिकारी सुनय लाड, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा समन्वयक प्रमोद टाले, ॲड. सुभाष विणकर, शाहीर के. ओ. बावस्कर, संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना सुनील शेळके म्हणाले, संविधानाने भारतीय नागरिकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. प्रत्येकाने संविधानाचा आदर केला पाहिजे. समाजाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या महामानवांना अभिवादन करुन आज ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्यावतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान जनजागृतीसाठी संघटना कटिबद्ध आहे.

यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा समन्वयक प्रमोद टाले यांनी संविधान सभा गठन व त्यावेळी आलेल्या अडचणींवर मत व्यक्त केले. ज्येष्ठ अधिवक्ता सुभाष विणकर यांनी संविधानाची ओळख व कलमांचे महत्व यावेळी सांगितले. शाहीर के. ओ. बावस्कर यांनी संविधानाचे गीत गात पोवाडा सादर केला. संघटनेचे राज्य सल्लागार डॉ. शिवशंकर गोरे यांनी सामाजिक न्यायाच्या अनुषंगाने संविधानाचे महत्व विशद केले. विविध सामाजिक संघटना तसेच शहरातील पतसंस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती.

संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन अनिल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी केले. संचलन संजय खांडवे यांनी तर आभार मुरलीधर टेकाळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन राऊत, उदय देशमुख, योगेश महाजन, सतीश राजपूत, राहुल बाजारे, संदीप सावळे, अनिल पडोळकर, केशव भोलाणे, नीतेश साखरे, प्रवीण चिंचोले, शुभम शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

# नागभीड मार्गावर रेल्वेच्या धडकेत वाघाचा मृत्यू




**चंद्रपूर :** चांदा फोर्ट–गोंदिया रेल्वे मार्गावर नागभीड तालुक्यातील किटाळी मेन्ढा येथे रेल्वेखाली येऊन वाघाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा अथवा सकाळी चंद्रपूर येथे जाणाऱ्या किवा चंद्रपूर येथून गोंदियाकडे जाणाऱ्या मार्गावर रेल्वेने वाघाला धडक दिली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या अपघातात वाघाचा मृत्यू झाला असावा असे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच वन अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत.

# जोतिबा आकाशाएवढा !



सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांचे स्थान एकूणच मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये अजरामर झालेले आहेत. त्यांनी केलेले कार्य आणि मानवतावादी दृष्टिकोनातून आयुष्यभर केलेली सामाजिक परिवर्तनाची साधना यामुळे महात्मा जोतीराव फुले यांना खऱ्या अर्थाने ‘महात्मा’ बिरुदावली शोभून दिसते. महात्मा फुले संपूर्ण हयातभर कार्य करत असताना अनेक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले तसेच अनेक प्रसंगी त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाला त्यांच्या हयातीत ह्या घटना त्यांचे अवघे आयुष्य कनकाप्रमाणे तेजस्वी करणाऱ्या ठरल्यास, परंतु त्यांच्यापश्चातदेखिल सामाजिक चळवळीच्या शिलेदारांना आणि एकूणच मानवी समाजाला त्यांचे जीवन प्रेरणादायी ठरणाऱ्या या घटना मानवी इतिहासाची प्रचंड समृद्धी संपन्नता देणाऱ्या होत.

महात्मा फुले यांचे असंख्य चाहते आणि त्यांना काळजात जपणारे तपस्वी अभ्यासक आहेत. प्रसिद्ध संशोधक आणि चरित्रकार धनंजय कीर यांच्या ‘महात्मा जोतिराव फुले’ या ग्रंथातील त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणारा एक हृदयस्पर्शी प्रसंग या ठिकाणी मुद्दाम द्यावासा वाटतो.

“जोतीबांच्या गौरवार्थ विश्रामबागवाड्यात १९ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सर्व सरदार आणि प्रमुख लोक यांची सभा बोलावली होती. समारंभाच्या प्रारंभी मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन सभेकडे वाचून दाखवले आणि नंतर सभेचा उद्देश मराठीत कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतिबांना एक शालजोडी (दोनशे रुपये किमतीची) सन्मानपूर्वक अर्पण केली.”

जोतिरावांचा हा सन्मान अनेक अर्थाने ऐतिहासिक होता, कारण स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी झटणारा पहिला भारतीय पुरुष म्हणून जोतीरावांची उंची त्यामुळे उत्तुंग हिमालयाएवढी झाली. ज्या धर्मग्रंथांनी व चातुर्वर्ण्यव्यवस्थेने स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षणबंदी घालून पशुवत जीवन जगण्यास बाध्य केले, त्याविरोधात उभे राहून शिक्षणाचा ओनामा रचणे म्हणजे हिमालयाप्रमाणे वादळवारे अंगावर घेण्यापेक्षाही भयंकर दिव्य होय. ते जोतिरावांनी झेलले, किंबहुना त्यापेक्षाही कठोर प्रसंग आणि जाच जोतीराव सहन करत ही शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत कशी पोहोचेल या ध्येयाने झपाटले होते. पण ज्यांच्यासाठी प्रयत्न चालू होते त्यांना त्याची फारशी जाणीव असण्याचे कारण नव्हते. इंग्रजी अमदानीत शिक्षणव्यवस्थेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र या कार्याचे महत्त्व किती वाटत होते आणि ऐतदेशीयांपेक्षा आंगलादेशीच्या गोऱ्या भावंडांना या देशातील लोकांच्या शिक्षणाबद्दल ज्योतिरावांची भूमिका कशी वाटत होती त्याचे प्रत्यंतर देणारी ही घटना सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची घटना होय.

त्या काळात सामाजिक कार्य करणे अतिशय कठीण होते कारण पेशवाईचा अंत होऊन पेशवाईची खुमखुमी अजून जिरली नव्हती, पण जोतीरावांनी विरोधाची तमा न बाळगता प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्याबद्दल कीर म्हणतात, ङ्ग मुलींच्या शाळा काढून जोतिरावांनी स्त्री शिक्षण क्षेत्रात जे प्रचंड कार्य केले होते त्याविषयी हा त्यांचा सत्कार झाला होता. त्यांच्या ज्या मित्रांनी त्यांना धैर्याने पाठिंबा दिला होता त्यांच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस होता. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील हा एक सुवर्ण दिन होता. एकोणिसाव्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडित झालेला आहे, असे सर हेन्री शार्प यांनी यथार्थपणे म्हटले आहे. त्या व्यक्ती म्हणजे डेव्हिड हॅरे, राम मोहन राय, विल्यम कॅरे प्रभुती होत. जोतिराव फुले हे त्यांच्यापैकी एक होते. स्त्रियांच्या हक्कासाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या ज्योती रावांचा ‘स्त्रियांचा उद्धारकर्ता’ म्हणून सत्कार झाला, त्यावेळी न्यायमूर्ती माधवराव रानडे हे दहा वर्षाचे होते. प्रतिगाम्यांचे शंकराचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन वर्षाचे होते. सामाजिक चळवळीचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर, स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई आणि महात्मा गांधी सेवा जन्मास आलेले नव्हते.

स्त्रियांचा शैक्षणिक इतिहास अर्थात, महात्मा जोतीराव फुले यांच्या देदीप्यमान कामगिरीने प्रारंभ होतो हे विशद करणारी ही टिप्पणी खऱ्या अर्थाने जोतिरावांचे महात्म्य लोकाभिमुख करणारी होय. जोतिरावांनी सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीशिक्षण किती प्राधान्याने घ्यायचे हे दाखवून दिले पण ते त्याच ठिकाणी थांबले नाही, रमलेही नाही. स्त्रीशूद्रातिशूद्र यांच्या सर्व अनर्थाचे कारण अविद्या आहे, तिची चिरफाड करतात. आणि या देशातील उच्च जात वर्ण समाज धर्म यांची चिकित्सा करुन मानव मुक्ती लढा त्यांच्या साहित्यकृतीतून सशक्त करतात. या देशातील जात–वर्णव्यवस्थेविरोधातील, आर्यभटाच्या अन्याय्य धर्मग्रंथविरोधातील लढ्याचे लढवय्यांचे अनेक दाखले उदाहरणे जोतिराव फुले व्यासंगपूर्ण मांडणीतून देतात. आणि शूद्रातिशूद्रांची सांस्कृतीक प्रतीके बळीराजा–खंडोबा–ज्योतिबा पासून कृषी संस्कृतीशी साधर्म्य पावणारी श्रमिकांच्या जीवनाशी त्यांचे साहचर्य दाखवून देतात. या सांस्कृतिक लढ्यात खऱ्या अर्थाने न्याय लढा आहे. खरा शोषक जाणून घेता येऊ शकतो, हा आत्मविश्वास देऊन ख्रिस्ती महंमदी आणि बुद्धपरंपरेतील समतेची प्रतीके या लढ्यात सहाय्यभूत ठरणारे आहेत, याची ज्योतिराव वारंवार मांडणी करतात. त्या समग्र मांडणीला, कार्याला संस्थात्मक पद्धतीने समाजाकडे हस्तांतरित करण्यासाठी मग २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करतात. आणि सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाची ही घटना जोतीरावांच्या एकुणच जीवनाचा सार आणि कार्याची दिशा स्पष्ट करणारी ठरते. शूद्रातिशूद्रांना ज्या भट भिक्षुकांनी अमानवी जीवन जगण्याची एक प्रकारे शिक्षा दिली त्यांचे पौरोहित्य नाकारुन अनेक ठिकाणी शूद्रातिशूद्र मंगल प्रसंग पार पाडू लागले. ह्यामागे शोषकांच्या बद्दल त्यांनीच शूद्रातिशूद्रांवर लादलेला पूज्यभाव त्यागून मनपरिवर्तन करणे ही महत्त्वाची भूमिका होती. पौरोहित्य नाकारणे म्हणजे ब्राह्मण्य नाकारणे, जातीयता नाकारणे होय. आणि डिकास्ट होण्यासाठी ही प्रक्रिया खूप मूलभूत समजली पाहिजे. जोतिरावांच्या या झंझावातापुढे प्रभिक्षकवर्ग तोंडघशी पडत गेला आणि बहुजन समाजात चैतन्य येऊ लागल्याने या विचाराच्या समर्थकांची संख्या पटीत वाढू लागली. जोतीरावांच्या पश्चातही ही कार्ये अनेक वर्ष चढ उतारासह होत आहे. वर्तमान परिस्थितीतही सांस्कृतीक लढे मुख्यतः जोतीरावांच्या विचारधारेवर आधारित गतिमान आहेत. याचे ईप्सित जोतीरावांच्या दूरदृष्टीत दिसून येते. भारतीय समाजाचे नीटपणे केलेले विश्लेषण आणि परिवर्तनाची अचूक दिशा जोतीरावांच्या जीवन– कार्य–विचारातून स्पष्ट होते हा विश्वास अनेक पिढ्यांसाठी फलदायी ठरणारा वाटत आहे.

जोतीरावांच्या कार्याचा गौरव सांगणारी एक घटना किती लोकांना प्रेरणादायी ठरू शकते. त्या कार्याचे महत्त्व लोकांना पटवून देऊ शकते. खुद्द ज्योतिरावांना विश्वास अन् आत्मविश्वास देऊ शकते. याचा विचार धनंजय कीरांसारख्या असंख्य ज्ञान तपस्वींना मोलाचा वाटत असल्याने साहित्यातील साधना पिढ्यानपिढ्या लोकोपयोगी ठरते, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळी आणि एक एक कार्यकर्ता समाजोपयोगी ठरत असतात. हे स्पष्ट होते.

**अनुज हुलके**

# जिल्ह्यातील दोन विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादीचा दावा कायम-अनिल देशमुख



**गोंदिया:** खरी राष्ट्रवादी काँग्रेस कुणाची याचा निर्णय लवकरच होईल. पण राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट संपूर्ण ताकीदीने विदर्भासह महाराष्ट्रातील विधानसभेच्या जागा महाविकास आघाडीत लढवेल.

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव आणि तिरोडा विधानसभा मतदारसंघावर पुर्वीपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला असून या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा दावा कायम राहिल. तसेच लोकसभा म तदारसंघाबाबत सुध्दा महाविकास आघाडीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते माजी मंत्री अनिल देशमुख यांनी गोंदिया येथे बुधव-ारी (दि.२२) आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

स्थानिक प्रिन्स लॉन येथे आयोजित पत्रकार परिषदेला खा. खुशाल बोपचे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष बजरंगसिंह परिहार, माजी आ. दीनानाथ पडोळे, दिलीप पनकुले, रविकांत बोपचे, जिल्हाध्यक्ष सौरभ रोकडे, जिल्हा कार्याध्यक्ष मिथून मेश्राम उपस्थित होते. अनिल देशमुख म्हणाले महाराष्ट्रात गेल्या दीड वर्षापासून केवळ फोडाफोडीचे राजकारण सुरु आहे. सरकारचे सर्व लक्ष याच गोष्टींकडे आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार व जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाले आहे. याम ुळे जनतेच्या मनात या सरकारप्रती प्रचंड आकस असून हा आकस २०२४ निवडणुकीत दिसून असा दावा केला. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना धानाला प्रति क्विंटल ७०० रुपये बोनस जाहीर केला होता. मात्र या सरकारने हेक्टरी बोनस जाहीर करुन शेतकऱ्यांची दिशाभूल केली. धानाला बोनस जाहीर करण्यासाठी हिवाळी अधिवेशनाची प्रतीक्षा न करता त्वरित हेक्टरी २५ हजार रुपये बोनस जाहीर करण्याची म ागणी यावेळी केली. यावेळी त्यांनी क्लिन चिट व त्यांची मुलगी आणि सून यांच्यावर दाखल झालेल्या आरोपपत्रावर बोलणे टाळले. तसेच भाजपने आपल्यावर केलेले आरोप हे तथ्यहिन असल्याचे स्पष्ट झाले असल्याचा दावा अनिल देशमुख यांनी केला.

### दवाबामुळेच ते नेते महायुतीत

**राष्ट्रवादी काँग्रेसचा एक गट ना.अजित पवार यांच्यासह महायुती सरकारमध्ये सहभागी झाला. त्यांच्यावर ईडी व सीबीआय कारवाई करण्याची होण्याची शक्यता असल्याने व दबावामुळे तेच महायुतीत सहभागी झाले. याची स्पष्टोक्ती ते आम्ही यंत्रणेच्या दबावामुळे गेलो नसल्याचे सांगून देत असल्याचा टोलाही देशमुख यांनी लगावला.**

# नोकरी लावून देण्याच्या नावावर फसवणाऱ्या ब्रम्हपूरीतील एका कुंटुबावर गुन्हा दाखल

## आधी दिला विश्वास, फोन उचलणे केले बंद नंतर दिली धमकी

**चंदू खोब्रागडे याने आधी नोकरी लाऊन देण्याचा विश्वास दाखविला. पैसे घेतल्यावर नोकरी लाऊन देण्याच्या केवळ भूलथापा दिल्या. त्यानंतर वारंवार फोन केल्याने फोन बंद केले.**

## दीक्षाकडून घेतले ८ लाख तर मंगेशच्या नोकरीसाठी घेतले ५.६० लाख

**९ जुलै २०२२ रोजी १ लाख रुपये, ४ ऑगस्ट २०२२ रोजी १ लाख ८० हजार रुपये, २१ सप्टेंबर २०२२ रोजी १ लाख ४५ हजार रोख रक्कम असे एकूण ४ लाख २५ हजार रुपये ट्रान्सफर केले तर ३ लाख ७५ हजार रुपये रोख दिले. तर मंगेश बडोले याला नोकरी लावून देण्याच्या नावावर २३ जानेवारी २०२२ रोजी ५० हजार, २५ जानेवारी २०२२ रोजी ५० हजार, ६ एप्रिल २०२२ रोजी १ लाख, २० एप्रिल २०२२ रोजी ४५ हजार, २५ एप्रिल रोजी ५० हजार, २६ जून रोजी ४५ हजार ८ जून २०२२ रोजी ५० हजार, दुस?यांदा २५ हजार, १७ डिसेंबर २०२२ रोजी ४५ हजार असे ४ लाख ६० हजार रुपये ऑनलाइन व १ लाख रोख असे एकूण ५ लाख ६० हजार दिले.**

**गोंदिया:** – आरोग्य सेवक म्हणून नोकरी लावून देण्याच्या नावावर दोघांकडून १३ लाख ६० हजार रुपये घेऊन त्यांची फसवणूक करणा?या चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथील एकाच कुटुंबातील चौघांवर डुग्गीपार पोलिसात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.तब्बल दीड वर्षापासून पैसे मोजूनही नोकरीची प्रतीक्षा करीत असलेल्या त्या दोघांच्या पदरी निराशा आली आणि त्यांनी अखेर पोलिस ठाणे गाठून फसवणूक करणाऱ्या आरोपी चंदू किशन खोब्रागडे (५०), सुचिता चंदू खोब्रागडे (४३), मोनिका चंदू खोब्रागडे (२४) व सानिया चंदू खोब्रागडे (२२) सर्व (रा. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सडक अर्जुनी तालुक्यातील चिखली येथील दीक्षा सुभाष मेश्राम (३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दीक्षा मेश्राम ह्या १० जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता बाणटोला येथील धाब्यावर ब्रम्हदास बडोले यांच्यासह चहा पीत असतांना त्या ढाब्यावर चारचाकी गाडी क्रमांक (एम.एच.३१ सी.आर.१०८०) हे वाहन आले. त्या वाहनातील व्यक्तीनीही चहाची व पाण्याच्या बॉटलची ऑर्डर दिला. त्या ग्राहकाने आपली ओळख चंदू किसन खोब्रागडे (रा. ब्रम्हपुरी) अशी देत आपण फायलेरीया विभागत डॉक्टर असून आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आपली खूप मोठी ओळख आहे, असे सांगितले.

फायलेरिया विभागात आरोग्य सेवक पदाची भरती निघाली आहे. तुमचे काही कँडीडेट असल्यास सांगा, आपण आपल्या ओळखीने त्यांना आरोग्य विभागामध्ये आरोग्यसेवक या पदावर लावून देतो असे सांगितले. नोकरीवर लावण्यासाठी एका व्यक्तीमागे ८ लाख रुपये द्यावे लागतील, असेही तो म्हणाला. त्याने आपला मोबाइल क्रमांक दिला आणि दीक्षा मेश्राम यांचा मोबाइल क्रमांक घेऊन गेला. चार-पाच दिवसांनतर चंदू खोब्रागडे हा दीक्षा यांच्या घरी त्याची पत्नी सुचिता, मुलगी मोनिका (२४) व सानिया (२२) यांच्यासोबत आला.

थोड्यावेळाने आ-लेले ब्रम्हदास बडोले यांनीही आपल्या मुलाच्या नोकरीसाठी चंदू खोब्रागडे यांना पैसे दिले असल्याचे सांगितले. पैसे जमवून ठेवा असे सांगून तो निघून गेला. पुन्हा आठ-दहा दिवसाने चंदू खोब्रागडे हा आपल्या पत्नी व मुलीसह दीक्षा यांच्या घरी चिखली येथे आला. त्यावेळी त्यांना ३ लाख ७५ हजार रुपये रोख दिले. त्यावेळी त्याची मुलगी मोनिका हिने काळजी करू नका, तुमची नोकरी पक्की आहे असे सांगितले. परंतु तब्बल २२ महिने लोटूनही नोकरी न देता त्यांची १३ लाख ६० हजाराने फसवणूक केली. या संदर्भात चारही आरोपींवर डुग्गीपार पोलिसांनी भादंविच्या कलम ४२०, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद बांबोडे करीत आहेत.

# जनावर तस्करांची चिचगड जंगलाला पसंती



**गोंदिया:** नक्षलग्रस्त, आदिवासीबहूल आणि किर्रर करणाऱ्या जंगलाचा फायदा घेत जनावर तस्कर देवरीपासून ४० ते ४५ किलोमीटर लांब असलेल्या ककोडी परिसरात जनावर तस्करांचे मोठे प्रस्थ आहे. हा मार्ग पोलिसांपासून बचाव करत कत्तलखान्यात जनावरे नेण्याकरिता सोयीस्कर आहे. या मार्गावरुन नेहमी ट्रकमध्ये कोंबून जनावरांना नेले जाते.

ककोडी परिसर जंगलव्याप्त आहे. शिवाय हा परिसर नक्षलरित्या अतिसंवेदनशील आहे. पोलिसांची देखील या परिसरात नेहमी गस्त सुरु असते. मात्र अशाही स्थितीत जंगल आणि रात्रीच्या काळोखाचा फायदा घेत तस्कर ककोडीच्या जंगलातील अंतर्गत रस्त्यांवरुन जनावरांची वाहनातून ने-आण करतात. पोलीस प्रशासन गुप्त माहितीच्या आधारे नेहमी अशा तस्करांवर कारवाई करतात. त्यानंतर कारवाईच्या धाकामुळे काही दिवस तस्करी बंद होते. यापुर्वी तत्कालीन पोलीस अधीक्षक हरीश बैजल,मंगेश शिंदे यांनी देखील लक्ष घातले.

सध्याचे पोलीस अधीक्षक यांनी देखील अवैध धंद्यांवर वचक बसविण्याच्या सुचना केल्या आ-हेत. मात्र काही दिवसांपासून आता पुन्हा तस्करांनी डोकेवर काढले आहे. ककोडी मार्गे जना-वरे कत्तलखान्यात नेण्यात येत आहेत. या परिसातून छत्तीसगड राज्यतून येणाऱ्या तस्करांवर अंकुश लावण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

### लोखंडी उंचीरोधक कठडे रस्त्यावर बसविले

**जड आणि मोठे वाहनांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने लोखंडी उंचीरोधक कठडे रस्त्यावर बसविण्यात आले होते. त्यामुळे जनावरे असलेले ट्रक लावू शकत नव्हते. मात्र ते कठडे तोडून तस्करांनी जना-वरे कत्तलखान्याकडे नेणे सुरु केल्याची माहिती आहे. ते कठडे पुन्हा बसविण्याची मागणी देखील गोप्रेमींनी केली आहे.**

# नवीन १५०० घरकुल मंजूर



**गोंदिया:** शहर विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर आमदार विनोद अग्रवाल यांच्या प्रयत्नांनी शहरात नवीन १५०० घरकुलांना नुकतीच मंजुरी प्रदान करण्यात आली. शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना घरकुल आवास योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आ.विनोद अग्रवाल सातत्ताने प्रयत्न करीत आहेत. गोंदिया नगरपरिषद हद्दीतील पुर्वीच्या मंजूर चार विकास आराखड्यातील कामे सुरु झाल्यानंतर आता ३ नवीन डीपीआर मंजूर करण्यात आले आहेत.

शहरी भागातील गरजूंना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी आ.अग्रवाल सातत्याने राज्य व केंद्र सरकारला पत्र लिहून करीत होते. या मागणीनुसार गोंदिया नगरपरिषदेंतर्गत केंद्र शासनाकडून ३ नवीन डीपीआर मंजूर करण्यात आले आहेत. मंजूर डीपीआर अंतर्गत १५०० घरकुलांचा लाभ गरजूंना मिळणार आहे. उर्वरित कुटुंबाच्याही मागणीसाठी लवकरच शासनाकडे पत्रव्यवहार करणार आहे. प्रत्येक गरजू व्यक्तीला घर असावे, हा आमचा प्रयत्न असल्याचे मत आ.विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केले.

# जि.प.बैठकीला मिळेना मुहूर्त, पदोन्नतीत कर्मचाऱ्यांचे नुकसान

## वेळकाढू धोरण:समितीची सभाच होत नसल्याचे कारण

**गोंदिया:** सातवा वेतन आयोग लागू होण्यापुर्वी सलग १२ वर्ष एकाच पदावर नोकरी केलेल्या कर्मचाऱ्याला कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात यायची. तो कालावधी आता सातव्या वेतन आयोगानंतर १० वर्ष झाला. नियमित पदोन्नती, कालबद्ध पदोन्नतीसाठी एक ठराविक वेळापत्रक तयार करण्याची गरज असताना जिल्हा प्रशास-नाने त्याकडे दुर्लक्ष केले. समितीची बैठकच ढाली नसल्याने जिल्हा परिषदेंतर्गत अनेक प्रकरणे अडगळीत पडली आहेत.



सातव्या वेतन आयोग लागू होऊन वर्ष लोटले, परंतु त्या वेतन आयोगानुसार आणि सलम १० वर्ष एकाच आस्थाप-नावर नोकरी झालेल्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती लागू करण्यात येते. परंतु गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह प्रशासनाला कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण निकाली काढण्यास वर्ष लागत असल्याने प्रशासन कासवाच्या गतीने चालल्याचे बघावयास मिळत आहे. गेल्या सहा महिन्यापासून तर बैठकच कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण काढण्यासाठी घेण्यात आलेली नाही. सामान्य प्रशासन विभागाकडे ५० ते ६० फाइल कालबद्ध पदोन्नतीसाठी अडकून पडल्या आहेत. त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, कृषी विभागासह पंचायत विभागातील ग्रामसेवकांच्या कालबद्ध पदोन्नतीचे प्रकरण वर्षानुवर्ष पडून राहत असल्याने जिल्हा परिषदेचे अधिकारी हे फक्त वेळकाढू धोरण राबवून मिळालेल्या आयएसओ प्रमाणपत्रांची टिंगलटवाळी करीत असल्याचा आरोप होत आहे. यासह चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदोन्नतीचे प्रकरण ही सामान्य प्रशासन विभागाने रेंगाळत ठेवले आहे. संबंधित विभागाप्रमुखाला आपल्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे प्रकरण तयार करुन समितीसमोर ठेवायचे असते. परंतु विभागप्रमुखही त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे. शिक्षण विभाग, समाजकल्याण, पंचायत विभाग, आर-ोग्य, पशुसंवर्धन विभागात असे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे बोलले जाते. वारंवार त्रुट्या काढून पैशांसाठी प्रकरण रेंगाळत ठेवण्यात येत असल्याचा आरोप देखील कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

# संविधान दिन निमित्ताने संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षेचे पुरस्कार वितरण

**गोंदिया:**-विविध जाती वर्ग समुदायात विभागलेल्या या देशाच्या नागरिकांना संविधान एकासंविधान सर्व नागरिकांना एका सुत्रात जोडणारा दुवा म्हणजे संविधान आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त समाज कल्याण विनोद मोहतुरे यानी केले.

संविधान मैत्री संघ व सहायक आयुक्त समाज कल्याण गोंदिया तसेच जिल्ह्यातील विविध शाळा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान गौरव प्रतियोगिता परिक्षा-२०२३ चे पुरस्कार वितरण संविधान दिन निमित्ताने सामाजिक न्याय भवन सभागृह समाज कल्याण गोंदिया येथे उत्साहात पार पडले. यावेळी म ंचावरून ते बोलत होते. या प्रसंगी मंचावर ज्येष्ठ नागरिक वसंत गवळी, संविधान मैत्री संघाच्या पोर्णिमा नागदेवे, जूनियर कॉलेज प्राध्यापक असो.चे अध्यक्ष पवन कटरे, समीना खान, प्रामुख्याने उपस्थित होते.

समाजात संविधानिक मूल्ये रुजविण्यासाठी जिल्ह्यात संविधान जागृती अभियान राबविण्यात येत आहे. युवा विद्यार्थी,महिला व नागरिकांना त्यांच्या हक्क अधिकारांची, देश हितार्थ कर्तव्यांची जाणीव असावी म्हणून संविधान गौरव प्रतियोगिता परिक्षेसारखे शैक्षणिक उपक्रम अभियानाअंतर्गत घेण्यात येत आहेत अशी माहिती आपल्या प्रास्ताविकेत प्रा.डॉ.दिशा गेडाम (संविधान जागृती अभियान जिल्हा समन्वयक) यांनी दिली. संचालन समाज कल्याण विभागाचे जांभुळकर यांनी तर उपस्थितांचे आभार संविधान मैत्री संघाचे सह संयोजक आदेश गणवीर यानी मानले.

ऑक्टोबर महिन्यात आयोजित संविधान गौरव प्रतियोगिता परीक्षेचे आयोजन जिल्ह्यातील सर्व ८ तालुक्यात ७५ परीक्षा केंद्राच्या माध्यमातून करण्यात आले होते. या परीक्षेत ४५०० पेक्षा जास्त परीक्षार्थी सहभागी झाले.या परीक्षेचे निकाल जाहीर करून प्रत्येक तालुक्याला ६ नगद व १० प्रोत्साहन पुरस्कार असे १६ पुरस्कार मिळून जिल्ह्यातील एकूण १२८ विजेत्या परीक्षार्थ्यांना १.२५ लाखाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाळा प्रशासन, केंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, तसेच सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रशस्तिपत्र व पेन देऊन यावेळी सन्मान करण्यात आला.

जिल्ह्यातील तालुकानिहाय पुरस्कृत विद्यार्थी- गोंदिया तालुका- जूनियर श्रेणी प्रथम – चिरंजीव नरेश करपते, द्वितीय- समीक्षा संजय नारनवरे, तृतीय – आकांक्षा रवींद्र तुरकर, सीनियर श्रेणी- प्रथम –परमेश्वरी धनला-लजी चौधरी, द्वितीय –आशिष आय. रंगारी, तृतीय- प्रगती त्रश्री चौव्हण, आमगाव तालुका –जूनियर श्रेणी प्रथम- नेहा जगदीश हेमणे, द्वितीय- महक संजय तुमसरे, तृतीय- शितल मनोहर ब्राम्हणकर, सीनियर श्रेणी प्रथम- नेहा सुनिल मेश्राम, द्वितीय-विनोद रामेश्वर भांडारकर, तृतीय- प्रियंका मुलचंद बोपचे, सालेकसा तालुका- जूनियर श्रेणी- प्रथम-आर्यन विलास बडोले, द्वितीय- चारूल पुरणदास वासनिक, तृतीय- शिल्पा कैलाश चुटे- सीनियर श्रेणी- प्रथम-रुपाली लक्ष्मण ढवरे, द्वितीय- कुणाल धनराज नोणारे, तृतीय-आरजु राजु शहारे, देवरी तालुका – जूनियर श्रेणी प्रथम- प्राजक्ता श्यामल सुखदेवे, द्वितीय- हिमानी नुरेश जनबंधु, तृतीय- कामिनी जगदीश उईके, सीनियर श्रेणी- प्रथम- सागर अजित खांडेकर, द्वितीय-उत्कर्ष गरिबा साखरे, तृतीय-परमानंद यशवंत अम्बादे, तिरोडा तालुका- जूनियर श्रेणी प्रथम- दिक्षा जागेश्वर सोयाम, द्वितीय तृप्ती विलास शेंडे, तृतीय- आँचल सुभाष तुमसरे, सीनियर श्रेणी प्रथम- संजना ए. बोहणे, द्वितीय- रजनी राजेश बाणासुरे, तृतीय- सविता विजय सार्वे, गोरेगाव तालुका- जूनियर श्रेणी मधुन प्रथम –नयन किशोर कुमार शहारे, द्वितीय- देवेंद्र राजेंद्र गणवीर , तृतीय – खुशी पुंजे, सीनियर श्रेणी प्रथम –छाया भीमराज राऊत, द्वितीय –सुरेश भाऊराव वालदे गिधाडी, तृतीय- रोहिणी चंभरू मौजे, सडक अर्जुनी- जूनियर श्रेणी प्रथम- नितेश ज्ञानीराम कोडवते, द्वितीय-सांची विनोद टेंभुर्णे, तृतीय-गायत्री काशीनाथ उपरीकर, सीनियर श्रेणी- प्रथम- आरती पप्पुसिंह ठाकुर, द्वितीय- जयश्री हेमंतकुमार मेंढे, तृतीय- कृणाल अनिल दोन-डे , अर्जुनी मोरगांव तालुका- जूनियर श्रेणी प्रथम –मुस्कान आनंद दहिवले, द्वितीय- रज्जत तेजराम कांबळे, तृतीय – अनिकेत राजकुमार मोहुर्ले, सीनियर श्रेणी प्रथम –प्रतिक हेमराज चव्हाण, द्वितीय –मयुरी मुकेश गौतम, तृतीय-शारदा शंकर पटले

या यशस्वी संविधान गौरव परीक्षा विजेत्यांना तसेच परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना, शाळा प्रशासनाला अगदी भरभरून शुभेच्छा देऊन सहायक आयुक्त समाज कल्याण गोंदिया संविधान मैत्री संघ व शाळा प्रशासन तर्फे अभिनंदन करण्यात आले

# महाआवास योजनेत गोंदिया राज्यात तिसरा



**गोंदिया:** प्रत्येकाच्या आयुष्यात स्वत:चे घर असावे, हे स्वप्न असते. गरीब, समाजाच्या शेवटच्या घटकातील व्यक्ती यांना तर घरकुल म्हणजे स्वप्न असते. ही स्वप्नपुर्ती करण्यासाठी केंद्र व राज्य शासन घरकुलांच्या विविध योजना राबविते.

या योजनांच्या समन्वयातून राज्य शासनाने महाआवास अभियान सुरु केले आहे. या अभियानाची अंमलबजावणी करण्यात राज्यात गोंदिया जिल्ह्याने तृतीय स्थान पटकाविले आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात महाआवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय कार्यशाळा शुभारंभ व सन २०२१-२२ चे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ ड्वले, ग्रामसडक योजनेचे सचिव के.पी.पाटील, कोकण विभागाचे विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर, नागपूर विभागाच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, राज्य व्यवस्थापन कक्षाचे संचालक डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

यावेळी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंमलबजावणीचा गोंदिया जिल्ह्याने तृतीय क्रमांक पटकाविला.

# मित्राच्या बहिणीवर जीव जडला,मग भावानेच मित्राचा काटा काढला

**गोंदिया :** तरुणाचा मित्राच्या बहिणीवर जीव जडला. त्यांच्यात मोबाईलवर बोलणे सुरू झाले. भावाला याबाबत कळले. त्याने मित्राला समजावले. मात्र, त्यानंतरही मित्र आणि बहिणीचे भेटणे, बोलणे सुरुच होते. भावाने आपल्या मित्राला पुन्हा समजावण्याचा प्रयत्न केला. यावरुन दोघांत वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने भावाने मित्राचा खून केला. ही घटना शहरातील डॉ. आंबेडकर चौक, गोंडीटोला रोड, कुडवा येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली. एका प्रेम प्रकरणाच्या या रक्तरंजित अंताची संपूर्ण जिल्ह्यात चर्चा आहे. प्रज्वल अनिल मेश्राम (२०, रा. कुडवा) असे मृताचे नाव आहे. रामनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रज्वल आणि दोन आरोपी हे तिघेही एकम ेकांचे मित्र असून यातील मृताचे आरोपीच्या बहिणीसोबत प्रेमसंबंध होते. यातून प्रज्वल आणि आरोपीचा यापूर्वीही वाद झाला होता. पण त्यानंतरही प्रज्वल आणि आरोपीची बहिण यांच्यात भेटीगाठी आणि मोबाईलवर बोलणे सुरुच होते. आरोपीने प्रज्वलला परत एकदा समजविण्याच्या उद्देशाने त्याच्या कुडवा येथील घरातून बाहेर बोलावले. दोघांत वाद आणि झटापट झाली. यानंतर आरोपीने प्रज्वलला चाकूने भोसकले. यात प्रज्वलचा मृत्यू झाला. पोलिसांनी याप्रकरणी आरोपी संकेत बोरकर (२०) व आदर्श भगत (२०) या दोघांना ताब्यात घेतले.



गुन्ह्यातील आरोपी संकेत अजय बोरकर वय २० याचे पाठीवर पाच जखमा असून त्यास उपचाराकरिता जी.एम.सी नागपूर येथे रेफर करण्यात आले. तर आरोपी आदर्श बाबूलाल भगत वय २१ रा. कन्हारटोली याच्या पायावर घटनेमुळे दुखापत झाली असून त्यावर केटीएस रुग्णालय येथे उपचार करण्यात आले आहे. सदर आरोपी हा सध्या रामनगर पोलिसांच्या ताब्यात आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पो-लीस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे रामनगर चे प्रभारी सपोनि-बस्तवाडे, पोउपनि-सोनवणे, श्रेणी पोउपनि- रहमतकर, पो हवा.भगत, राजेश भुरे, चव्हान, कपिल नागपुरे यांनी केलेली आहे.

# नामांकित कंपन्यांची २२६ बनावट घड्याळे जप्त

**गोंदिया:** नामांकित कंपन्यांचे लोगो व स्टिकर्स वापरून बनावट घड्याळ व चष्मे विकणाऱ्या शहरातील कुडवा लाईन व सिंधी कॉलनीत एका दुकानावर २३ नोव्हेबर रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत २२६ बनावट घड्याळे जप्त करण्यात आली.




एसएनजी सॉलिसिटर कंपनी लि. नवी दिल्ली यांचे अधिकृत प्रतिनिधी गौरव तिवारी (३७) यांच्यासह पोलिसांनी कुडवा लाईन येथील ग्रीन वॉच व सिंधी कॉलनीतील न्यू बजाज शॉप या दुकानावर छापा टाकून कारवाई केली. यात ग्रीन वॉच या दुकानातून सोनाटा या नामांकित कंपनीचे बनावट लोगो असलेल्या ११९ घड्याळी, टायटन कंपनीचे बनावटी लोगो व स्टिकर असलेल्या ५६ घड्याळी, फास्ट ट्रक कंपनीच्या ५ बनावटी घड्याळी व फास्ट ट्रॅक कंपनीचे २ बनावटी चश्मे जप्त करण्यात आले. तसेच न्यू बजाज शॉपमधून सोनाटा व टायटन कंपनीचे बनावटी लोगो असलेल्या ४९ घड्याळी व फास्ट ट्रक कंपनीच्या दोन अशा एकूण २२६ बनावटी घड्याळी पोलिसांनी जप्त केल्या.

प्रकरणी आरोपी श्यामलाल मोहनदास बजाज ५४, रा. सुरजमल बगीचा, सिंधी कॉलनी, गोंदिया व आरोपी मोहन प्रितमदास नागदेव २७, रा. सख्खर धर्मशाळेचा मागे माताटोली गोंदिया या दोन्ही दुकानदारांवर कलम ६३, ६५, कॉपीराईट अधिनियम १९५७ सहकलम १०३, १०४, ट्रेड मार्क अक्ट १९९९ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास गोंदिया शहर पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक मंगेश वानखेडे करीत आहेत.

# केवळ १६७ शेतकरी आत्महत्याच पात्र

## २२ वर्षात २९४ शेतकऱ्यांनी संपविले जीवन: शासन दरबारी लाभासाठी १२७ अपात्र

**गोंदिया:** नापिकी आणि त्यातच बँकाकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड या चिंतेत असलेल्या जिल्ह्यातील २९४ शेतकऱ्यांनी गेल्या २२ वर्षात जीवनयात्रा संपविली. मात्र शासनदरबारी १२७ शेतकरी अपात्र ठरविण्यात आल्या आहे. केवळ १६७ शेतकरी आत्महत्याच शासनाच्या योजनेसाठी पात्र ठरविण्यात आल्या. दु:खाचा डोंगर कोसळलेल्या त्या कुटुंबाला शासनाकडून एक लाख रुपये देण्यात येते. परंतु या निधी देतानाही समित्या आखडता हात घेत असल्याचे प्रत्यक्ष चित्र आहे.

जिल्ह्यात २००१ ते ऑक्टोबर २०२३ या काळात तब्बल २९४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. कुणी गळफास लवला, कुणी विषारी औषध प्राशन केले, कुणी विहिरीत, तलावात उडी घेत जीवनप्रवास थांबविला. नापिकी, निसर्गाचा लहरीपणा, पेरलेले पीक अपेक्षित प्रमाणात घरी न येण्याची शाश्वती, आर्थिक चणचण, बँकेच्या कर्जाचा वाढता डोंगर याची चिंता शेतकऱ्याला सतावत असते. त्यातूनच कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा-कसा करायचा, मुलांचे शिक्षण या आणि अशाच समस्येच्या चक्रव्युहात साडपलेला शेतकरी आत्महत्या करण्याचे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्या हे समस्यांचे नाही, तरी मात्र खचलेला शेतकरी हे धाडक करीत असल्याचे दिसून येते. जिल्ह्यात सर्वाधिक २०१५ साली ३१ शेतकऱ्यांनी जीवन संपविले. मात्र, शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी जिल्हा प्रशासनात असलेल्या समितीकडे प्रकरण ठेवण्यात येतात. त्यात पात्र ठरलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला एक लाख रुपये देण्यात येतात. त्यानुसार गेल्या २२ वर्षात २९४ पैकी केवळ १६७ प्रकरणेच समितीने पात्र ठरविली आहेत. त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना १ कोटी ६७ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. तर उर्वरित १२७ प्रकरण अपात्र ठरविण्यात आले.

### दृष्टिक्षेपात शेतकरी आत्महत्या

| वर्ष | एकूण शेतकरी आत्महत्या | पात्र | अपात्र | मदत(लाख) |
|---|---|---|---|---|
| 2001 | 0 | 0 | 0 | o |
| 2002 | 1 | 1 | 0 | 1 |
| 2003 | 1 | 1 | 0 | 1 |
| 2004 | 6 | 2 | 4 | 2 |
| 2005 | 6 | 6 | 0 | 6 |
| 2006 | 22 | 17 | 5 | 17 |
| 2007 | 19 | 17 | 2 | 17 |
| 2008 | 18 | 9 | 9 | 9 |
| 2009 | 12 | 7 | 5 | 7 |
| 2010 | 22 | 16 | 6 | 16 |
| 2011 | 13 | 10 | 3 | 10 |
| 2012 | 10 | 6 | 4 | 6 |
| 2013 | 6 | 4 | 2 | 4 |
| 2014 | 17 | 9 | 8 | 9 |
| 2015 | 31 | 10 | 21 | 10 |
| 2016 | 31 | 10 | 21 | 10 |
| 2017 | 18 | 6 | 12 | 6 |
| 2018 | 17 | 5 | 12 | 5 |
| 2019 | 10 | 5 | 5 | 5 |
| 2020 | 8 | 5 | 3 | 5 |
| 2021 | 16 | 13 | 3 | 13 |
| 2022 | 7 | 5 | 2 | 5 |
| 2023 | 3 | 3 | 00 | 3 |
| एकूण | 294 | 167 | 127 | 167 |

**चालू वर्षात तीन आत्महत्या**

२०२३-२४ या चालू आर्थिक वर्षात जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यात फेब्रुवारी महिन्यात अर्जुनी मोरगाव आणि गोरेगाव तालुक्यातील प्रत्येकी एक आणि जुलै महिन्यात आत्महत्या केलेला शेतकरी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आहे. तीनही प्रकरण पात्र ठरविण्यात आले असून त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत देखील देण्यात आली.

# १२०० हून जास्त आरोग्य कर्मचाऱ्यांचा संप; रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर




**गोंदिया :** सरकारी सेवेत सामावून घ्यावे, समान काम आणि समान वेतन या प्रमुख मागणीसाठी एनएचएम कर्मचाऱ्यांनी गेल्या एक महिन्यापासून संप सुरू केला आहे. त्याचा विपरीत परिणाम बालकांच्या आरोग्य तपासणी मोहिमेवरही दिसून येत आहे. या संपात डॉक्टर, परिचारिका, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाल्याने गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य सेवाही ठप्प झाली आहे. असे असतानाही एनएचएम कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे सरकार गांभीर्याने लक्ष देत नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्ह्यातील आरोग्य विभागात १२०० हून अधिक डॉक्टर, परिचारिका, औषध उत्पादक, अभियंते, क्षयरोग अधिकारी व कर्मचारी, बाल आरोग्य तपासणी मोहीमेत अधिकारी व कर्मचारी आरोग्य सेवा देत आहेत. मात्र तुटपुंजे मानधन देऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ दिला जात नाही.

शासकीय सेवेत समावेश करून समान काम व समान वेतन लागू करावे या प्रमुख मागणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान, कंत्राटी अधिकारी-कर्मचारी, समायोजन कृती समिती जिल्हा गोंदिया यांच्या वतीने २५ ऑक्टोबर पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या-आंदोलनात बाराशेहून अधिक अधिकारी-कर्मचारी सहभागी आहेत. डॉक्टर, परिचारिका, अधिकारी, कर्मचारी संपात सहभागी झाल्याने राष्ट्रीय बाल आरोग्य तपासणी मोहिमेसह जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर परिणाम झाला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य सेवा देणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शासन अन्याय करत आहे. कोविड काळात अनेकांना जीव धोक्यात घालून जीवदान दिले. ज्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला. त्यांच्या मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. संपामुळे आरोग्य सेवेवर परिणाम झाला आहे. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत संप सुरू राहणार आहे, असे डॉ. आशिष रहांगडाले (उपसमन्वयक, गोंदिया) यांनी म्हटले आहे.

# १४ डिसेंबरपासून १७ लाख कर्मचारी संपावर-आशिष रामटेके



**गोंदिया :** जुनी पेंशन योजना पूर्वलक्षीप्रभावप्रमाणे लागू करावी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना स्थायी सेवेत सामावून घ्यावे, अनुकंपा यादीतील उमेदवारांना सेवेत सामावून घ्यावे, रिक्त पदे भरावी यासह १७ मागण्यांसाठी मार्च महिन्यात आम्ही सात दिवस संप केला होता. मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी आम्हा मागण्या मंजूर करण्याबाबत लेखी आश्वासन दिले होते. आजवर त्याबाबत कुठलीच कार्यवाही झा-लेली नाही. सरकारने जर आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर १४ डिसेंबरपासून राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी पुन्हा बेमुदत संपावर जाणार आहेत. असा इशारा राज्य सरकारी कम 'चारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्राचे सहसचिव आशिष प्र.रामटेके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिला आहे.

रामटेके म्हणाले, मार्च २०२३ मध्ये आम्ही सात दिवस संप पुकारला होता. जुनी पेंशन योजना पूर्वलक्षीप्रभावाने लागू करावी ही आमची प्रमुख मागणी होती. राज्यातील चार लाख रिक्त पदे भरावीत, राज्यात ८३ हजार कर्मचारी गेल्या १५ वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने काम करतात, त्यांच्या सेवा नियमित कराव्यात, यासह विविध १७ मागण्या होत्या. सात दिवसांच्या संपानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा केली. त्यावेळी ३० सचिव हजर होते. जुनी पेंशन योजनेसाठी सुबोधकुमार समिती नेमली. समितीने तीन महिन्यांत अह-वाल देणे अपेक्षित होते. अहवाल अद्याप पूर्ण झाला नाही, असेही ते म्हणाले.राजस्थान, ओरिसा या राज्यांमध्ये जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातात मग आपल्याकडे का नाही? आम्ही १४ डिसेंबरची मुदत दिली आहे. तोवर मागण्या मान्य झाल्या नाही तर बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा निवेदनातून आशिष रामटेके यांनी राज्यसरकारला दिला आहे.

# चेकपोस्टवर एंट्रीच्या नावाखाली पैशांची लूट



**गोंदिया:** महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर असलेल्या सिरपुर येथील परिवहन विभागाच्या आरटीओ चेकपोस्टवर एंट्रीच्या नावाखाली ट्रक चालक-मालक यांच्याकडून होणारी अवैध वसुली थांबवून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी देवरी तालुका शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातर्फे करण्यात आली. त्यासंदर्भात तालुका प्रमुख सु-नील मिश्रा यांनी आपल्या इतर पदाधिकाऱ्यांसोबत बुधवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देवरीचे तहसीलदार अनिल पवार यांच्यामार्फत निवेदन सादर केले.

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर असलेल्या सिरपुर येथील राज्य परिवहन विभागाच्या आरटीओ चेकपोस्टरवरुन दररोज सहा ते आठ हजार ट्रक येणे-जाणे करतात. येथील चेकपोस्टवर अंदाजे आठ ते दहा आरटीओ निरीक्षकांची ड्युटी असते. प्रत्येक निरीक्षक ४८ तास ड्युटी करीत असतात. ड्युटीवर येणारे अधिकारी आपल्यासोबत तीन ते चार आपले लोक घेवून येतात. त्यांच्यामार्फत चेकपोस्ट करुन येणाऱ्या-जाणाऱ्या गाडी चालक व मालकांकडून या एंट्रीच्या ना-वावर प्रत्येक ट्रकचालकाकडून प्रत्येकी दोनशे ते हजार रुपये उकळतात. ट्रकचालकांची लूट करण्यात येत आहे. याप्रकारची अनेकदा तक्रार करण्यात आली, परंतु हा गोरखधंदा बंद झालेला नाही. यात संबंधित अधिकारी १० ते १५ लाख रुपये प्रत्येक दिवशी ट्रक चालकांकडून जमा करतात. ती रक्कम स्वतःच्या खिशात घा-लतात. त्यामुळे येथील अधिकारी महिन्याला कोट्यावधी रुपयांचा शासनाचा महसूल बुडवत आ-हेत. असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात दे-वरी तालुका प्रमुख सुनील मिश्रा, देवरी शहर प्रमुख राजा भाटीया, उपतालुका प्रमुख डालचंद मडावी यांच्यासह बहुसंख्या शिवसैनिकांचा समावेश होता.

**लाचलुचपत विभागाकडे तक्रार**

शिवसेनेच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनात आतापर्यंत खूप झाली लूटमार, आता कर्जाचे हप्तेही न भरु शकणारे ट्रकचालक आणि इतर वाहन चलकांची लूट खपवून घेणार नाही. अधिकारी आपले घर भरुन शासनाचा महसूल आपल्या घशात भरतात. हा प्रकार मान्य नाही. अन्यथा गाठभेट शिवसेनेशी आहे. असा इशारा निवेदनातून देण्यात आला.सदर निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, दे-वरीचे ठाणेदार, आमदार सह-षराम कोरोटे यांना देण्यात आले. मजेची बाब म्हणजे लाचलुचपत प्रतिबंध विभागालादेखील निवेदन दिल्यामुळे कुणाची विकेट तर पडणार नाही, अशी शंका उपस्थित करण्यात येत आहे.

# गडचिरोली जिल्हा काँग्रेस करणार वनमंत्र्यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन



**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातील अनेक भागात जंगली हत्ती आणि नरभक्षक वाघाच्या हल्ल्यात वाढ झालेली आहे. त्यामध्ये अनेक निष्पाप नागरिकांचा जीवही जात आहे. सोबतच अनेक गावातील शेतीचेही नुकसान होत असल्याने जंगली हत्ती आणि नरभक्षक वाघांचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी गडचिरोली जिल्हा काँग्रेसच्या वतीने वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा काँग्रेसच्या वतीने वारंवार मागणी करुनही वनविभाग, पालकमंत्री आणि वनमंत्र्यांनी अद्यापही तोडगा न काढल्यामुळे आता थेट वनमंर्त्यांच्या घरासमोर ३० नोव्हेंबर रोजी ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी कळविले.

सोमवारी ब्राह्मणवाडे यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक शासकीय विश्राम भवनात घेण्यात आली. यावेळी प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव डॉ.नामदेव किरसान, माजी जि.प.उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, शहर अध्यक्ष सतीश विधाते यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# आता शाळांमध्ये राबविणार "वाचन चळवळ"

## शासनाचा उपक्रम, विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न

**नागपूर:** महाराष्ट्र शासन, युनिसेफ, प्रथम बुक्क आणि रीड इंडिया यांच्यावतीने राज्यातील सर्व शाळांमध्ये "महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. इयत्ता तिसरीपर्यंतची मुले २०२६ पर्यंत ओघवते वाचन करु शकतील आणि इयत्ता आठवीतील प्रत्येक मुल शिकण्यासाठी वाचू शकेल, हे सुनिश्चित करणारी आनंददायी वाचनाची चळवळ आता राज्यात निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार आहे.

राज्यातील इयत्ता तिसरीतील ३० टक्क्यांपेक्षा जास्त मुले आणि पाचवीपर्यंतची ४१ टक्के मुले योग्य प्रकारे वाचू शकत नाहीत. मात्र, लहानपणापासून मुलांना मातृभाषेत गोष्टींची पुस्तके उपलब्ध करुन दिल्यास हे चित्र बदलू शकते. या उद्देशाने महाराष्ट्रातील वाचन चळवळ हा उपक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या वतीने राबविला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत वर्षातील काही तारखा निश्चित करुन शाळेत वाचन वर्ग घेतले जाऊन त्यात विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील. आनंदाच्या तासांतर्गत "ड्रॉप एव्हरीशिंग अँड रीड' या उपक्रमांतर्गत शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरु होण्यापुर्वीच १५-२० मिनिटे शिक्षक आणि कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळापत्रकात समाविष्ट केला जाईल. राज्यातील सर्व शासनमान्य व खासगी शाळांचा या उपक्रमात सहभाग असेल. या वाचन चळवळीला वाचनसंस्कृतीच्या महायज्ञाचे स्वरूप दिले जाणार आहे. यात प्रत्येक आठवड्यात एक विषय निश्चित करुन त्यावर आधारित पुस्तकांचे शाळांमध्ये वाचन केले जाईल. मात्र, खाजगी शाळांना पुस्तके दिली जाणार नाहीत.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांकडून मार्गदर्शक सुचना तयार केल्या जातील.

याशिवाय वक्तृत्व स्पर्धा आणि लेखन स्पर्धांचे आयोजन केले जाईल. एक ते दोन मिनिटांचे व्हिडिओ करुन ते योग्य ठिकाणी अपलोड करण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे. युनिसेफ आणि रीड इंडियाच्या सहकार्याने ऑनलाईन प्लॅटफॉर्म विकसित करुन त्यावर विद्यार्थ्यांचे व्हिडिओ, ध्वनिफिती आणि निबंध अपलोड करण्यास शाळांना सांगण्यात येणार आहे. ज्या ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या गा-वातील आणि शहरातील सर्व मुले तिसरीच्या स्तरापर्यंत वाचू शकतात, असे घोषित करतील त्यांना शासनातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या उपक्रमाकरिता समग्र शिक्षा अंतर्गत सर्व शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांना वयोगटानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत पुस्तके उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. याशिवाय, दहा वर्गातील दहा पुस्तकांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

### ब्रँड ॲम्बेसेडर व प्रसारमाध्यमांचा आधार

**□मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करण्यासाठी लोकसहभाग, मुलांना वाचनाचे महत्व समजावणे, मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करणे, मुलांवर चांगले संस्कार करणे, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटकांमधून रसास्वादाची दृष्टी निर्माण करण्याचा या चळवळीचा उद्देश आहे.**

**□त्यासाठी ब्रँड ॲम्बेसेडरची नियुक्ती केली जाणार आहे, तसेच वाचनाची जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रिंट, इलेक्ट्रॉनिक्स, रेडियो आणि इंटरनेटसारख्या माध्यमांचाही उपयोग केला जाणार आहे.**

**□रोजगार नोकरी संदर्भ हे साप्ताहिक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या आणि संस्काराच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त साप्ताहिक आहे.**



### ही पुस्तके उपयुक्त ठरणार

**प्रेरक गोष्टी, विजयपथ, आपणही असे घडावे, विचारातील सौंदर्य, पुढचे पाऊल, शिखर गाठण्यासाठी, प्रगतीचा पाऊलवाटा, आकर्षणाचा नियम, ही नाथे प्रकाशनाची पुस्तके वाचन चळवळीसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.**

### उपक्रम असा.....

- ○दर आठवड्यात दोन वाचन तासिका
- ○गोष्टींचा शनिवार
- ○आनंदाचा तास
- ○ग्रंथोत्सव व पुस्तकाचे प्रदर्शन
- ○रीड इंडिया सेलिब्रेशन उपक्रम

# गोठणगाव परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या होणार आता दुर-यशवंत गणवीर



**अर्जुनी मोरगाव:** आदिवासी वस्ती समजल्या जाणाऱ्या गोठणगाव परिसरात पिण्याच्या पाण्याची ज्वलंत समस्या आ-वासून उभी होती. पिण्याच्या पाण्यासाठी महिला भगिनींना सतत पायपीट करावी लागते. आदिवासीबहूल क्षेत्रातील मूलभूत गरजांची तीव्र समस्या लक्षात घेऊन एक कोटींचा निधी मंजूर करण्यात यश आले. नव्याने निर्माण होऊ घातलेल्या पाणीपुरवठा योजनांमुळे आता पिण्याच्या पाण्याची भेडसावणारी समस्या कायमस्वरूपी दूर होणार, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यशवंत गणवीर यांनी केले.

गोठणगाव जिल्हा परिषद प्रभागातील ग्राम झाशीनगर, भसभोळण व चुटिया येथे बांधणयात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामाला सुरुवात करताना गुरुवारी ते बोलत होते. याप्रसंगी जि.प.सदस्य श्रीकांत घाटबांधे, पं.स.सदस्य घनश्याम घामट, सरपंच सुचित्रा शील, उपसरपंच सुबोध मुजुमदार, खोकन सरदार, झाशीनगरच्या सरपंच आशा गदवार, रवींद्र नाईक, संजीव गुरनुले, दिलीप कोरेटी, लता किरसान, लक्ष्मी मेश्राम, कल्पना मांदाडे, सागर येळे, शिवम अग्रवाल उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, परिसरातील सामान्य जनतेला दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या मूलभूत समस्या दूर करण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. गरजूंना, सामान्य जन-तेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विकासकार्याला सर्वाधिक निधी मिळविण्याचे आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

# देसाईगंजच्या एका कथित नेत्याकडून राष्ट्रीय मानचिन्हाचा गैरवापर

## राष्ट्रीय प्रतिक अधिनियम २००५ व आयटी ॲक्ट अन्वये कारवाईची मागणी

**गडचिरोली:**-भारताचे राष्ट्रीय प्रतिक अधिनियम २००५ नुसार राष्ट्रीय चिन्हाचा खाजगी वापर करण्यास प्रतिबंध आहे. असे आढळल्यास संबंधितांवर दंड व शिक्षेचीही तरतुद आहे. भारताचे गौरव चिन्हांपैकी एक असलेल्या अशोकस्तंभ या चिन्हाचा सर्रास गैरवापर देसाईगंज येथील एका कथित नेत्याने मंत्री व अधिकारी यांना पत्र देत असल्याची गंभीर तेवढीच धक्कादायक माहिती समोर आली असून जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.

भारताचे राष्ट्रीय प्रतिक अधिनियम २००५ मधील शेड्युल १ नुसार राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीयमंत्री, राज्यपाल, लेफ्टनंट जनरल, केंद्र शासित प्रशासक, शासकीय अधिकारी, कार्यालय, न्यायाधीश, न्यायालयीन अधिकारी, योजना कमिशनचे अधिकारी, कार्यालये, मुख्य निवडणूक आयुक्त, हे राष्ट्रीय चिन्ह वापरू शकतात. राष्ट्रीय चिन्ह वापरण्या संदर्भात मार्गदर्शक सूचना आहेत राष्ट्रीय चिन्ह कोणी वापरावे या बाबतीत स्पष्टपणे नमूद केले आहे त्याचा गैरवापर कोणीही करू शकत नाही राष्ट्रीय चिन्हांचा कोणीही नियमबाह्य वापर रुन उल्लंघन केल्यास दोन वर्षाची शिक्षा आणि ५००० रुपये किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

त्यामुळे देसाईगंज येथील एका कथित नेत्याने राष्ट्रीय प्रतिक असलेल्या अशोकस्तंभ या चिन्हाचा सर्रास गैरवापर करुन अवमान केला असुन गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज (वडसा) येथील वळुमाता पशुप्रजनन क्षेत्रातील २३३.५७ हे आर ही जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी २४ नोव्हेंबर ला जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले असताना देसाईगंज येथील एका विशिष्ट सामाजिक संघटनेचा कार्याध्यक्ष असलेल्या लेटरपॅडवर भारताचे राष्ट्रीय प्रतिक असलेल्या अशोकस्तंभ या चिन्हाचा सर्रास गैरवापर वापर करून उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्र देऊन अवमानना करित समाज माध्यमात मोठ्या प्रमाणात व्हायरल केल्याने या कथीत नेत्यावर भारताचे राष्ट्रीय प्रतिक अधिनियम २००५ व माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

# नित्यानंद झा नवीन अपर पोलीस अधीक्षक




**गोंदिया:** जिल्ह्याचे अपर पो-लीस अधीक्षक अशोक बनकर यांचे स्थानांतर झाले. त्यांच्याठिकाणी नित्यानंद झा गोंदियात रुजू झाले. त्यांनी आपल्या पदाचे सुत्र स्विकारले.

२०१९ तुकडीचे आयपीएस अधिकारी नित्यानंद झा यांची पदोन्नतीने पदस्थापना गोंदिया जिल्ह्यात अपर पोलीस अधीक्षक म्हणून करण्यात आली आहे. जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांचे स्थानांतर झाले. नित्यानंद झा यांनी आपल्या पदाचा पदभार अशोन बनकर यांच्याकडून स्विकारला. पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांच्या संकल्पनेतून नक्षलग्रस्त अतिदुर्गम आदिवासी भागातील गोरगरीब जनतेच्या हिताकरिता राबविण्यात येत असलेले कम्युनिटी पोलिसिंग, पोलीस दादालोरा खिडकी योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारचे नावीण्यपूर्ण उपक्रम राबवून देवरी, सालेकसा, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आणि गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांना सोयी सुविधा मिळवून देण्यात अशोक बनकर यांचा सिंहाचा वाटा राहिला असल्याचे मनोगत पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांनी व्यक्त केले.

# प्राथमिक शिक्षकांना मिळणार आता माध्यमिकसाठी बढती

## अतिरिक्त भार होईल हलका:जि.प.निर्णय घेणार का?




**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील शिषकांना माध्यमिक शाळांत बढती मिळण्याचा मार्ग नागपूर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. या निर्णयाचा अंमल करण्यासाठी राज्य शासनाकडून सुचना मिळताच ही कार्यवाही होऊ शकते. परंतु गोंदिया जिल्हा परिषद प्रशासन याबाबत निर्णय घेणार की नेहमीप्रमाणे या विषयाकडे दुर्लक्ष करणार हे महत्वाचे ठरणार आहे. जर निर्णय घेतलाच तर ज्येष्ठता यादी वेळेत होणार का, हा प्रश्नच राहणार आहे.

शिक्षकाला जिल्हा परिषदेच्या शाळेतच माध्यमिक शिक्षक म्हणून पदोन्नतीचे मार्ग आतापर्यंत बंद होते. यासाठी महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. दहा नोव्हेंबर रोजी न्यायालयाने दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, जिल्हा परिषद सेवा प्रवेश नियम १९६७ मधील नियम ५० खंड चार परिशिष्ट चार भाग २ नुसार जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षक हे माध्यमिक शिक्षक म्हणून पद-ोन्नतीस पात्र आहेत. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक शिक्षक म्हणून पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षकांना पदोन्नती द्यावयाची असेल तर सेवा ज्येष्ठता यादी तयार करणे महत्वाचे असते.

### इच्छुकांना कळविणे महत्वाचे

**जिल्ह्यात प्राथमिक पदवीधरांची जवळपास १० पदे आहेत. प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक पदोन्नसतीसाठी गोंदिया जिल्हा परिषदेने निर्णय घेतला तर माध्यमिक शाळेवर जाण्यास किती जण इच्छूक आहेत. याची माहिती संकलित करण्यासाठी त्यांना कळविणे महत्वाचे राहील.**

### अनेक संघटनांची होती मागणी

**प्राथमिक शिक्षकांना माध्यमिक शिक्षक म्हणून पदोन्नती देण्याची मागणी मागील काही वर्षांपासून होत होती. यासाठी विविध शिक्षक संघटनांनी पाठपुरावा केला होता. यातच दुसरीकडे रिक्त जागांवर शिक्षक भरती झालेली नाही. बीएससी बीएड झालेल्या शिक्षकांच्या पदोन्नतीबाबत विचार झाल्यास त्यांना व्यावसायीक पात्रतेनुसार वेतन तसेच त्यांच्या कामाचा दर्जाही वाढू शकतो.**

### विषय शिक्षक मिळणार, भारही कमी होणार

**प्राथमिकमधून माध्यमिकच्या पदोन्नतीसाठी पात्र संख्येहून बीए,बीएड,बीएससी बीएड झालेल्या शिक्षकांची निवड झाली, तर इंग्रजी, गणित आणि विज्ञान शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात काही शिक्षक अतिरिक्त आहेत. तर माध्यमिक शिक्षक पदोन्नतीचा निर्णय झाला तर जिल्हा परिषदेतील अतिरिक्त शिक्षकांचा भार कमी होऊ शकेल तसेच पदस्थापनेनंतर शिक्षकांचे वेतन काढणे सुलभ ठरु शकेल, असे मत या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.**

# मराठ्यांना कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्यास विरोध; ओबीसी महामोर्चात एल्गार



**यवतमाळ :** आरक्षण समर्थनार्थ ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी रविवारी येथील आझाद मैदानातून काढण्यात आलेल्या महामोर्चात मराठ्यांना कुणबी, ओबीसी प्रवर्गातून आर-क्षण देण्यास तीव्र विरोध करण्यात आला. ओबीसी बांधवांनी यावेळी एकजुटीचा संदेश दिला. या मोर्चात हजारो समाज बांधव सहभागी झाले होते.

ओबीसी समाजाच्या आर-क्षणाला धक्का लावण्यात येऊ नये, मराठा समाजाला सरसकट कुणबी जातीचे प्रमाणपत्र देवून त्यांचे ओबीसीकरण करण्यात येऊ नये, ओबीसींसाठी प्रत्येक तालुक्यात वसतिगृह सुरू करण्यात यावे, जातीनिहाय जनगणना करावी, आदी मागण्यांसाठी ओबीसी महामोर्चाकडून मोर्चा काढण्यात आला. स्थानिक महात्मा फुले चौकातून निघालेला हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गाने काढण्यात आला होता.

या मोर्चात हजारो ओबीसी बांधव सहभागी झाले होते. थोर पुरुषांच्या वेशात सहभागी झालेली बालके, डफडी, ढोल ताशा वादक पथके, लक्षवेधी ठरले. महात्मा फुले चौकातून निघालेला हा मोर्चा यवतमाळ शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळाने निव-ासी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देऊन चर्चा केली. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, मराठ्यांना आरक्षण द्या, अशी मागणी केली. त्यानंतर मोर्चेकऱ्यांच्या शिष्टमंडळातील सदस्यांनी आणि काही प्रमुख नेत्यांनी मोर्चाला संबोधित केले. तीव्र आंदोलनासाठी ओबीसी बांधवांनी सज्ज राहावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.